# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक १९.०१.२०१३ (का.प.क्र.०५) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शनिवार दिनांक १९.०१.२०१३ (का.प.क्र.०५) रोजी मा.महापौर सौ.कला रविनंदन ओझा यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.११.५५ वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.पुरूषोत्तम भापकर,भा.प्र.से. तसेच नगर सचिव श्री.ओ सी सिरसाट तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे स. सदस्य उपस्थित होते.

१. स.स.श्री.जोशी संजय रामदास
२. स.स.श्री.विकास रतनलाल जैन
३. स.स.श्री. वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत
४. स.स.डॉ.खान जफर अहेमद
५. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
६. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
७. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद
८. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
९. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग
१०. स.स.श्री.बनकर कृष्णा सांडुजी
११. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
१२. स.स.श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे
१३. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
१४. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर
१५. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश
१६. स.स.श्री.भुईगळ अमित सुधाकर
१७. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु
१८. स.स.श्री.नागरे किशोर बाबुराव
१९. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२०. स.स.सौ.उर्मिला नितीन चित्ते
२१. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
२२. स.स.श्री.बोराडे रामदास काशीनाथ
२३. स.स.श्री.घोडिले आनंद राधाकिसन
२४. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
२५. स.स.श्री.चौधरी संजय सांडू

२६. स.स.श्री.शिंदे राजू रामराव
२७. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
२८. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
२९. स.स.श्री.इंगळे सुरेश सांडुजी
३०. स.स.श्री.खान जहांगिर अब्बास
३१. स.स.श्रीमती जरीना म.जावेद
३२. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद
३३. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान
३४. स.स.श्री.मिर्झा सलीम बेग मिर्झा हमीद बेग
३५. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
३६. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
३७. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
३८. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
३९. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
४०. स.स.श्रीमती कविता संजय जाधव
४१. स.स.श्रीमती परवीन खैसर खान
४२. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
४३. स.स.श्रीमती करीमुन्नीसा बेगम जमीलखान
४४. स.स.श्री.अफसरखान यासीन खान
४५. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा खान
४६. स.स.श्री.मोहम्मद मुजीबउद्दीन कदिरोद्दीन
४७. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
४८. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
४९. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल
५०. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
५१. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
५२. स.स.श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
५३. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
५४. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
५५. स.स.श्री.खान आगा मिया खान
५६. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
५७. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान
५८. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर
५९. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे

६०. स.स.श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण
६१. स.स.श्री.मधुकर दामोधर सावंत
६२. स.स.श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
६३. स.स.श्रीमती शोभा पुखराज काळे
६४. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
६५. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव
६६. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
६७. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
६८. स.स.श्रीमती शिंदे सत्यभामा दामोधर
६९. स.स.श्रीमती निलाबाई देविदास जगताप
७०. स.स.श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
७१. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल
७२. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
७३. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
७४. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
७५. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने
७६. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव
७७. स.स.श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र
७८. स.स.श्री.खेडकर सुशिल तुकाराम
७९. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश
८०. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
८१. स.स.श्री.अब्दुल सिकंदर अब्दुल साजेद
८२. स.स.श्रीमती घोडेले अनिता नंदकुमार
८३. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने
८४. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन
८५. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश
८६. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव
०२. स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद
०३. श्रीमती पाटील रेखा दिनकरराव
०४. श्रीमती हेमलता प्रकाश मुगदिया

श्री.रेणुकादास वैद्य :स.सदस्य श्री.मोहन मेघावाले यांच्या भगीनी श्रीमती मीराबाई गणेशलाल जोडीवाले यांचे नुकतेच दु:खद निधन झाले त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.महेश माळवतकर :यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

याच वेळी स्व.मिराबाई जोडीवाले यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

**चर्चा:**

श्री.अफसर खान : शासनाकडे एक प्रस्ताव घेवून कोणकोण गेलेले होते त्या बाबत काय झाले माहिती दयावी.

श्री.रेणुकादास वैद्य :अगोदर विषयपत्रिका घ्यावी त्यानंतर जनरल चर्चा करावी.

श्री.गिरजाराम हाळनोर :सभा कामकाज नियमावलीनुसार अगोदर विषय घेतले जाते नंतर चर्चेला वेळ देण्यात यावा

श्री.अफसर खान :अगोदर चर्चा घ्यावी त्यानंतर विषयपत्रिका घेण्यात यावी.

श्री.मीर हिदायत अली :आपल्या कार्यकाळातील ही तिसरी सभा यापूर्वीच्या दोन सभेत चर्चा होवू दिली नाही मागिल अडीच वर्ष जसे सभागृहाचे कामकाज चालले त्याप्रमाणे आताही चालावे सर्वांना न्याय मिळावा चर्चा करण्यावी संधी मिळावी अशी विनंती.

श्री.गिरजाराम हाळनोर :विषय अगोदर घ्यावे नंतर चर्चा घ्यावी.

या वेळी अनेक स.सदस्य डायस जवळ येवून एकाच वेळी बोलत असतात.

**विषय क्रमांक ७७:**

दिनांक २९.०९.२०११ (का.क्र.प.क्र.२७), दिनांक २१.०३.२०१२ (दि.१६.०३.२०१२ तहकूब सभा का.क्र.प.क्र.३७) व दिनांक ०४.०४.२०१२ (अर्थसंकल्पीय का.क्र.प.क्र.३८) तसेच दिनांक ०७.०४.२०१२ (का.क्र.प.क्र.३९) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

श्री.गिरजाराम हळनोर :मागे जे झाले ते झाले यापूढे अगोदर विषय पत्रिकाच घ्यावी.या इतिवृत्तास मंजूरी दयावी यापूढे इतिवृत्त वेळेवर देण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य :यात ४-५ बैठकीपूर्वीचे इतिवृत्त दिले इतका उशीर न होता ताबडतोब इतिवृत्त देण्याची प्रशासनाने दखल घ्यावी इतिवृत्त कायम करण्याचा हा विषय मंजूर करावा.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

मा.महापौर :विषय ७७ मंजूर,मागिल सर्व बैठकीचे इतिवृत्त लवकरात लवकर देण्यात यावे.

**ठराव :**

दिनांक २९.०९.२०११ (का.क्र.प.क्र.२७), दिनांक २१.०३.२०१२ (दि.१६.०३.२०१२ तहकूब सभा का.क्र.प.क्र.३७) व दिनांक ०४.०४.२०१२ (अर्थसंकल्पीय का.क्र.प.क्र.३८) तसेच दिनांक ०७.०४.२०१२ (का.क्र.प.क्र.३९) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करण्यास मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्रमांक ७८:**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन २००६ च्या प्रक्रियेत लिलाव न झालेली ०७ वाहनांचा दिंनांक ०६/०१/२०११ रोजी निविदा पध्दतीने लिलाव करण्यात आला. सदर प्रस्तावास मा. स्थायी समिती ठराव क्रमांक १७७ दिनांक १४/०३/२०११ नुसार प्रस्ताव स्थगीत करण्यात आला. सदरचा प्रस्ताव नगरसचिव विभाग मार्फत मा. सर्वसाधारणसभे पुढे ठेवण्यात आला. मा. सर्वसाधारणसभा

ठराव क्रमांक ४४७ दिनांक ०७/०९/२०११ नुसार सात वाहने निर्लेखीत करण्याचा प्रस्ताव मा. स्थायी समितीने रदद् केला असल्याने सदरील प्रस्तावातील नमुद वाहने व इतर वाहनांची नव्याने निविदा काढण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

लिलाव न झालेली ०७ वाहने व इतर प्रस्तावित ३३ वाहने असे एकूण ४० वाहने लिलाव करणेस देण्यात आलेल्या मंजुरी नुसार सदरील वाहनांचे गर्व्हमेंट व्हॅल्युअर कडून सद्यस्थिती नुसार किंमत काढून घेण्यात आली. स्थापन केलेल्या ऑक्शन समितीने मुल्यांकन अहवालास मान्यता दिलेली आहे. लिलाव समितीचा अहवाल बंद लिफाफयात मुख्यलेखाधिकारी महानगरपालिका, औरंगाबाद यांच्या ताब्यात ठेवण्यात आलेला आहे. सदरील बंद लिफाफा जाहीर लिलावाच्या दिवशीच लिलावस्थळी लिलाव समिती सदस्यासमोर उघडण्यात येईल. सदर लिलाव प्रक्रिया करीता मे. शंकर रामचंद्र ऑक्शनर, पुणे यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

मा. सर्वसाधारण ठराव क्रमांक ४४७ दिनांक ०७/०९/२०११ नुसार सन २००६ च्या लिलाव मध्ये लिलाव न झालेली ७ वाहने व इतर वाहनांची नव्याने निविदा पध्दतीने विल्हेवाट लावण्याची मान्यता आहे. मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनुसार वाहने निर्लेखीत करण्यासाठी दिनांक १७.१०.२०१२ रोजी जाहीर लिलावाचे आयोजन करण्यात आले होते. परंतु लिलावधारकांनी वाहनांचा ताबा त्वरीत देणे बाबत मागणी केली. तसेच मा. सर्वसाधारण सभेने जाहिर लिलावा ऐवजी निविदा पध्दतीने लिलाव करणे बाबत मान्यता दिलेली असल्याचे दिसुन आल्यामुळे जाहीर लिलाव प्रक्रिया थांबविण्यात आली. या प्रकरणी लिलाव समिती मध्ये झालेल्या चर्चेनुसार सर्व ४० वाहनांच्या तपशिलासह व जाहीर लिलाव पध्दतीने लिलाव करणे बाबत मा. सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव फेर सादर करण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. जाहीर लिलाव पध्दतीने लिलाव करावयाच्या ४० वाहनांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Sr. no | Vehicle No. | Type of vehicle | Model year | Period of use year |
|---|---|---|---|---|
| 1 | MWP/1478 | P-6 Truck | 1983 | 28 |
| 2 | MTB/4348 | Open trailer | 1981 | 30 |
| 3 | MAA/308 | MahindraJeep | 1985 | 26 |
| 4 | MXV/5488 | Intrnat.Tractor | 1986 | 25 |
| 5 | MXV/5267 | Intrnat.Tractor | 1982 | 29 |
| 6 | MVG/8211 | MahindraJeep | 1988 | 23 |
| 7 | MVG/9353 | Mahindra Jeep | 1989 | 22 |
| 8 | MH20/M-7000 | Premier Car-118 | 1997 | 14 |
| 9 | MH20/U-1492 | Amb. Car | 1999 | 12 |
| 10 | MH20/E-3600 | Tata Estate car | 1996 | 15 |
| 11 | MH20/E-2006 | Maruti Van | 1996 | 15 |
| 12 | MH20/E-3301 | Maruti-800 Car | 1997 | 14 |
| 13 | MH20/E-3302 | Maruti-800 car | 1997 | 14 |
| 14 | MH20/E-3303 | Maruti-800 car | 1997 | 14 |
| 15 | MH20/E-3304 | Maruti-800 car | 1997 | 14 |
| 16 | MH20/E-3305 | Maruti-800 car | 1997 | 14 |
| 17 | MH20/E-3306 | Maruti-800 car | 1997 | 14 |
| 18 | MH20/E-1860 | Maruti-800 car | 1995 | 16 |
| 19 | MH20/1870 | Maruti-800 car | 1995 | 16 |
| 20 | MH20/H-5001 | Contesa car | 1996 | 15 |
| 21 | MH20/E-8258 | Mahindra Jeep | 1993 | 18 |
| 22 | MH20/E-8079 | Mahindra Jeep | 1992 | 19 |
| 23 | MH20/E-8260 | Mahindra Jeep | 1993 | 18 |
| 24 | MH20/E-8078 | Mahindra Jeep | 1992 | 19 |
| 25 | MH20/E-3333 | Maruti Jypsi | 1997 | 14 |
| 26 | MH20/E-9102 | Mahindra Jeep | 1994 | 16 |
| 27 | MH20/H-3000 | Esteem car | 1996 | 15 |
| 28 | MH20/9472 | Mahindra Jeep | 1991 | 20 |
| 29 | MH20/9476 | Mahindra Jeep | 1991 | 20 |
| 30 | MH20/9481 | Mahindra Jeep | 1991 | 20 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 31 | MH20/9482 | Mahindra Jeep | 1991 | 20 |
| 32 | MVG/8919 | Mahindra Jeep | 1988 | 23 |
| 33 | MH20/F-5336 | Loading Riksha | 1996 | 15 |
| 34 | MH20/F-5337 | Loading Riksha | 1996 | 15 |
| 35 | MH20/F-5338 | Loading Riksha | 1996 | 15 |
| 36 | MH20/F-5339 | Loading Riksha | 1996 | 15 |
| 37 | MH20/-F5340 | Loading Riksha | 1996 | 15 |
| 38 | MH20/-F-5341 | Loading Riksha | 1996 | 15 |
| 39 | MH20/A-2314 | Nath Trailer | 1990 | 21 |
| 40 | Hydrulic Unit | Ladder Unit | 1989 | 22 |

उपरोक्त ४० वाहनांचा लिलाव करतांना जाहीर लिलावामध्ये ज्या वाहनांची किंमत गव्हर्नमेंट व्हॅल्यूअरने ठरविलेल्या किमती पेक्षा जास्त प्राप्त होईल, अशा वाहनांची किंमत व त्या वरील सर्व प्रकारच्या कराचा जास्तीची बोली बोलणाऱ्याकडून मनपा फंडात भरणा करुन घेवुन लिलाव धारकास वाहनांचा ताबा देण्यात येईल. लिलाव समिती तसेच मा. सभापती, स्थायी समिती यांनी नियुक्त केलेल्या दोन स. सदस्यांच्या समक्ष वाहनांचा लिलाव करण्यात येईल. लिलाव प्रक्रिया संपन्न झाल्या नंतर लिलाव संदर्भात माहिती मा.स्थायी समितीस देण्यात येईल. तरी उपरोक्त ४० वाहने जाहीर लिलावाद्वारे निर्लेखीत करुन विक्री करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद:**

श्री.रेणुकादास वैद्य :ही वाहने कधीची आहे कोणत्या विभागात आहे.

श्री.अफसर खान :चर्चा करावी त्यानंतर विषय घ्यावे.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.गिरजाराम हळनोर :या प्रस्तावा बाबत खुलासा करावा.

या वेळी मा.महापौर डायस समोर स.श्री.जुबेर गाजी, श्री.अमीत भुईगळ श्री.कृष्णा बनकर डायस समोर येवुन मोठमोठयाने बोलत होते.

मा.महापौर :डायस समोर कुणी येवू नये आपआपल्या जागेवर बसावे.शांतता राखावी.चर्चा विषय पत्रिका झाल्यावर करणार आहोत.

श्री.अमित भुईगळ :चर्चा अगोदर नंतर विषयपत्रिका घ्यावी.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.गिरजाराम हाळनोर :हा विषय मंजूर करावा.

मा.महापौर :७८ विषय मंजूर

**ठरावः**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा. सर्वसाधारण ठराव क्रमांक ४४७ दिनांक ०७/०९/२०११ नुसार सन २००६ च्या लिलाव मध्ये लिलाव न झालेली ७ वाहने व इतर वाहनांची नव्याने निविदा पध्दतीने विल्हेवाट लावण्याची दिलेली मान्यता व या प्रकरणी लिलाव समिती मध्ये झालेल्या चर्चेनुसार जाहीर लिलाव पध्दतीने लिलाव करावयाच्या प्रस्तावातील ४० वाहनांचा दिलेल्या तपशिल नुसार जाहीर लिलाव करुन ज्या वाहनांची किंमत गव्हर्नमेंट व्हॅल्यूअरने ठरविलेल्या किमती पेक्षा जास्त प्राप्त होईल, अशा वाहनांची किंमत व त्या वरील सर्व प्रकारच्या कराचा जास्तीची बोली बोलणाऱ्याकडून मनपा फंडात भरणा करुन घेवुन लिलाव धारकास वाहनांचा ताबा देण्यास लिलाव समिती तसेच मा. सभापती, स्थायी समिती यांनी नियुक्त केलेल्या दोन स. सदस्यांच्या समक्ष उपरोक्त ४० वाहने जाहीर लिलावाद्वारे निर्लेखीत करुन विक्री करण्यास मंजुरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी

**विषय क्रमांक ७९:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका अर्थसंकल्प-२०१२-१३, वार्ड क्र.७२ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवाशाच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे. म्हणुन प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | पान क्र.अनु.क्र. | २०१२-१३ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे |
|---|---|---|---|
| १ | वार्ड ई Spill १०८ अ. क्र. २० | वार्ड क्र. ७२ मध्ये विविध विकास कामे करणे. रु.१०.०० लक्ष | वसंतराव नाईक पुतळयाचे सुशोभिकरण करणे र.रु. ५.५० लक्ष |

सुचक : श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड अनुमोदक : श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका अर्थसंकल्प-२०१२-१३, वार्ड क्र.७२ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यांत येते,

| अ.क्र. | पान क्र.अनु.क्र. | २०१२-१३ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे |
|---|---|---|---|
| १ | वार्ड ई Spill १०८ अ. क्र. २० | वार्ड क्र. ७२ मध्ये विविध विकास कामे करणे. रु.१०.०० लक्ष | वसंतराव नाईक पुतळयाचे सुशोभिकरण करणे र.रु. ५.५० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८०:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.७२,एन-४,एफ-१ सेक्टर मधील घर क्र.६४ व ६५ समोरील महानगरपालिकेच्या उद्यानास " **समई उद्यान**" हे नांव द्यावे असे स्थानिक नागरीकांची मागणी आहे. करीता प्रस्ताव सादर.

सुचक : श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड अनुमोदक : श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७२,एन-४,एफ-१ सेक्टर मधील घर क्र.६४ व ६५ समोरील महानगरपालिकेच्या उद्यानास " **समई उद्यान**" हे नांव देण्यांस मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८१:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा. सर्व साधारण सभेने शिफारस केलेले वार्ड क अंतर्गत सन २०१२-१३ करिता नवीन कामांची यादी मध्ये पृष्ठ क्र. GBR-Ward-c New Work १८ वर अ.क्र.११ नुसार वार्ड क्र.४२ मक्सुद कॉलनी नाल्यावर पुल बांधणे या कामासाठी १०.०० लक्ष रु. ची तरतुद करण्यात आलेली आहे. परंतु वार्ड क्र.४२ मधील इतर कामांसाठी पुरेशी तरतुद नसल्याने सदरील कामासाठी ठेवण्यात आलेली रक्कम खालील प्रमाणे वळती करुन लेखाशिर्षात बदल करण्यात यावा.

| सर्वसाधारण सभेने शिफारस केलेले काम | लेखाशिर्षात बदल करुन वळती करावयाची कामे |
|---|---|
| GBR-Ward-C-New Work-१८<br>नविन कॉंक्रीटरस्ते शहरी भाग:-<br>अ.क्र.११) वार्ड क्र.४२ मकसूद कॉलनी नाल्यावर पुल बांधणे.<br>रक्कम रु.१० लक्ष | १) वार्ड क्र.४२ मध्ये विविध ठिकाणी G.I.पोल्स लावणे.२-०० लक्ष<br>२) वार्ड क्र.४२ मध्ये विविध ठिकाणी उर्जा बचत पथदिवे. २-०० लक्ष<br>३) करीम कॉलनी येथे नविन मेनहोल व ड्रेनेजलाईन. २-०० लक्ष<br>४) मकसुद कॉलनी ग.न.१ मध्ये ड्रेनेज लाईनचे काम. २-०० लक्ष<br>५) वार्ड क्र.४२ मध्ये विद्युती करणाची फुटकळ कामे करणे. १-०० लक्ष<br>६) वार्ड क्र.४२ येथील ड्रेनेजची फुटकळ कामे करणे. १-०० लक्ष |

करीता प्रस्ताव सर्व साधारण सभेत सादर.

सुचक : श्री.मुजीबखान मीर आलमखान अनुमोदक : श्री.बेहडे अशोक किसनराव

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१२-१३ वार्ड क्र.४२ मक्सुद कॉलनी नाल्यावर पुल बांधणे या कामासाठी १०.०० लक्ष रु. ची करण्यात आलेली रक्कम खालील प्रमाणे वळती करुन लेखाशिर्षात बदल करण्यास मंजुरी देण्यांत येते,

| सर्वसाधारण सभेने शिफारस केलेले काम | लेखाशिर्षात बदल करुन वळती करावयाची कामे |
|---|---|
| GBR-Ward-C-New Work-१८<br>नविन कॉंक्रीटरस्ते शहरी भाग:-<br>अ.क्र.११) वार्ड क्र.४२ मकसूद कॉलनी नाल्यावर पुल बांधणे.<br>रक्कम रु.१० लक्ष | १) वार्ड क्र.४२ मध्ये विविध ठिकाणी G.I.पोल्स लावणे.२-०० लक्ष<br>२) वार्ड क्र.४२ मध्ये विविध ठिकाणी उर्जा बचत पथदिवे. २-०० लक्ष<br>३) करीम कॉलनी येथे नविन मेनहोल व ड्रेनेजलाईन. २-०० लक्ष<br>४) मकसुद कॉलनी ग.न.१ मध्ये ड्रेनेज लाईनचे काम. २-०० लक्ष<br>५) वार्ड क्र.४२ मध्ये विद्युती करणाची फुटकळ कामे करणे. १-०० लक्ष<br>६) वार्ड क्र.४२ येथील ड्रेनेजची फुटकळ कामे करणे. १-०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८२:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.५५ मधील विकास कामासाठी सन २०१२-१३ या अर्थ संकल्पात ठेवण्यात आलेली आहे. खालील कामा ऐवजी सुधारीत कामासाठी तरतूद ठेवण्यात येवून कामा हाती घेण्याच्या प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

| अ.क्र. | प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|---|
| १. | लेखाशिर्षक : स्पिल ओव्हर वार्ड -क, सन २०१२-१३ अर्थ संकल्प पेज नं.६४ अ.क्र.३ वार्ड क्र.५५ मो.कैसर कॉलनी मिनारा मस्जीद ते समी कॉलनी पर्यत नवीन इटालियन पेव्हर ब्लॉक बसविणे.<br>रु. १०.०० लक्ष | वार्ड क्र.५५ कैसर कॉलनी मधीलनागसेन कॉलनीत ट्रि मिक्स कॉंक्रेटीकरण करणे रुपये : १०.०० लक्ष |
| २. | वार्डक्र. ५५ मो. कैसर कॉलनी,नागसेन कॉलनी अल्ताफ यांच्या हम्जा मस्जीद पर्यत पेव्हर ब्लॉक बसविणे.रु.१०.०० लक्ष | वार्ड क्र.५५ ,कैसर कॉलनी येथे विविध ठिकाणी ट्रि मिक्स कॉंक्रेटीकरण करणे.रु.१०.०० लक्ष |
| ३. | वार्ड क्र.५५ येथे विविध ठिकाणी पुर्नडांबरीकरण करणे. रु.१०.०० लक्ष | वार्ड क्र.५५ येथे विविध ठिकाणी ट्रिमिक्स कॉंक्रेटीकरण करणे. रु.१०.०० लक्ष |

सुचक : श्री.शहनवाज खां रहेमान　　　　　अनुमोदक : श्री.गायकवाड रावसाहेब धोंडीराम

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५५ मधील विकास कामासाठी सन २०१२-१३ या अर्थ संकल्पात ठेवण्यात आलेली तरतुद खालील सुधारीत कामासाठी वळती करण्यांस मंजुरी देण्यांत येते,

| अ.क्र. | प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|---|
| १. | लेखाशिर्षक : स्पिल ओव्हर वार्ड -क, सन २०१२-१३ अर्थ संकल्प पेज नं.६४ अ.क्र.३ वार्ड क्र.५५ मो.कैसर कॉलनी मिनारा मस्जीद ते समी कॉलनी पर्यत नवीन इटालियन पेव्हर ब्लॉक बसविणे.<br>रु. १०.०० लक्ष | वार्ड क्र.५५ कैसर कॉलनी मधीलनागसेन कॉलनीत ट्रि मिक्स कॉंक्रेटीकरण करणे रुपये : १०.०० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| २. | वार्डक्र. ५५ मो. कैसर कॉलनी,नागसेन कॉलनी अल्ताफ यांच्या हम्जा मस्जीद पर्यत पेव्हर ब्लॉक बसविणे.रु.१०.०० लक्ष | वार्ड क्र.५५ ,कैसर कॉलनी येथे विविध ठिकाणी ट्रि मिक्स कॉंक्रेटीकरण करणे.रु.१०.०० लक्ष |
| ३. | वार्ड क्र.५५ येथे विविध ठिकाणी पुर्नडांबरीकरण करणे. रु.१०.०० लक्ष | वार्ड क्र.५५ येथे विविध ठिकाणी ट्रिमिक्स कॉंक्रेटीकरण करणे. रु.१०.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८३:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,लेखाशिर्ष बदला बाबतचा खालील प्रस्ताव येत्या सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा, ही नम्र विनंती.

| अ.क्र. | अंदाजपत्रकातील अ.क्र.मुळ काम | सुधारीत काम |
|---|---|---|
| ०१ | वार्ड क्र.४० नवाबपुरासाठी सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्र.GBR-Ward-C New Work-२० वर स्मशानभुमी विकास या अंतर्गत अ.क्र.०१ वर वार्ड क्र.४० बनेमियॉ कब्रस्तान विकसीत करणेसाठी र.रु.५.०० लक्ष व अ.क्र.०३ वर वार्ड क्र.४० निजामोद्दीन दर्गा कब्रस्तान विकसीत करणेसाठी र.रु.५.०० लक्ष तरतुद उपलब्ध आहे. | १. वार्ड क्र.४० नवाबपुरा अंतर्गत विविध ठिकाणी एल.ई.डी.पथदिवे बसविणे. र.रु.५.०० लक्ष<br>२. वार्ड क्र.४० नवाबपुरा रणमस्तपुरा अंतर्गत विविध ठिकाणी एल.ई.डी.पथदिवे बसविणे.<br>३. र.रु. ५.०० लक्ष |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती परवीन खैसर खान अनुमोदक : श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक ४० मधील लेखाशिर्ष बदलून सुधारीत काम करण्यास मंजुरी देण्यांत येते,

| अ.क्र. | अंदाजपत्रकातील अ.क्र.मुळ काम | सुधारीत काम |
|---|---|---|
| ०१ | वार्ड क्र.४० नवाबपुरासाठी सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्र.GBR-Ward-C New Work-२० वर स्मशानभुमी विकास या अंतर्गत अ.क्र.०१ वर वार्ड क्र.४० बनेमियॉ कब्रस्तान विकसीत करणेसाठी र.रु.५.०० लक्ष व अ.क्र.०३ वर वार्ड क्र.४० निजामोद्दीन दर्गा कब्रस्तान विकसीत करणेसाठी र.रु.५.०० लक्ष तरतुद उपलब्ध आहे. | १. वार्ड क्र.४० नवाबपुरा अंतर्गत विविध ठिकाणी एल.ई.डी.पथदिवे बसविणे. र.रु.५.०० लक्ष<br>२. वार्ड क्र.४० नवाबपुरा रणमस्तपुरा अंतर्गत विविध ठिकाणी एल.ई.डी.पथदिवे बसविणे.<br>३. र.रु. ५.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८४:**

सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात वार्ड क्र.२८ नेहरुनगर मध्ये विविध विकास कामे करण्यासाठी स्पील ओव्हर लेखाशिर्षांतर्गत आर्थिक तरतुद करण्यात आली आहे. सदरील लेखाशिर्षामध्ये खालील प्रमाणे बदल (वळती) करण्यात यावी.

| अर्थसंकल्प २०१२-१३ मध्ये ठेवण्यात आलेली तरतुद | लेखाशिर्षांत बदल करून करावयाची तरतुद |
|---|---|
| १) वार्ड क मध्ये स्पील ओव्हर कामाच्या "नाला सफाई खर्च " पृष्ठ क्र.Ward-C-५३ वर वार्ड क्र.२८ मधील औरंगाबाद टाईम्स कॉलनी नाल्यास संरक्षित भिंत बांधणे.-१०.०० लक्ष | नेहरुनगर वार्डामध्ये विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणे. १०.०० लक्ष रुपये. |
| २) वार्ड क मधील पृष्ठ क्र.Ward-C-स्पील ५३ वर " नाला सफाई खर्च " लेखाशिर्षा खाली अ.क्र.३ वर औरंगाबाद टाईम्स कॉ.येथे R.C.C. नाल्याची संरक्षित भिंत बांधणे.-१०.०० लक्ष रु. | नेहरुनगर वार्डामध्ये विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणे. -१०.०० लक्ष रुपये. |
| ३) वार्ड क मधील पृष्ठ क्र.Ward-C-स्पील ५६ "शहरी भागात रस्ते दुरुस्ती पॅचवर्क " लेखाशिर्षा खाली अ.क्र.१६ वर वार्ड क्र.२८ अंतर्गत गल्ल्यामधील माती उचलणे.-५.०० लक्ष रु. | १) वार्ड क्र.२८ मध्ये विविध ठिकाणी बोरींग करुन हातपंप बसविणे.३-०० लक्ष रुपये<br>२) वार्ड क्र.२८ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज दुरुस्ती देखभाली ची फुटकळ कामे करणे.-२.०० लक्ष रुपये. |
| ४) वार्ड क मधील स्पील ओव्हर कामे पृष्ठ क्र.Ward-C-स्पील ६४ वर अ.क्र.४ वर R.C.C.पुल बांधणे.-३०.०० लक्ष | १) वार्ड क्र.२८ नेहरुनगर येथे विविध ठिकाणी डांबरीकरण करणे.-३०.०० लक्ष रुपये. |
| ५) वार्ड क मधील पृष्ठ क्र.Ward-C-स्पील-६४ वर नविन खडी रस्ते (शहरी भाग) अ.क्र.१ वर औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथे खडीकरण व कॉंक्रटींग करणे.-१०.०० लक्ष रु. | १) नेहरुनगर वार्डामध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणे.-७.५० लक्ष रुपये. |

सुचक : श्री.खान जहांगीर अब्बास खान, अनुमोदक: श्री.बेहडे अशोक किसनराव,

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात वार्ड क्र.२८ नेहरुनगर मध्ये विविध विकास कामे करण्यासाठी स्पील ओव्हर लेखाशिर्षामध्ये खालील प्रमाणे बदल (वळती) करण्यास मंजुरी देण्यांत येते,

| अर्थसंकल्प २०१२-१३ मध्ये ठेवण्यात आलेली तरतुद | लेखाशिर्षांत बदल करून करावयाची तरतुद |
|---|---|
| १) वार्ड क मध्ये स्पील ओव्हर कामाच्या "नाला सफाई खर्च " पृष्ठ क्र.Ward-C-५३ वर वार्ड क्र.२८ मधील औरंगाबाद टाईम्स कॉलनी नाल्यास संरक्षित भिंत बांधणे.-१०.०० लक्ष | नेहरुनगर वार्डामध्ये विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणे. १०.०० लक्ष रुपये. |
| २) वार्ड क मधील पृष्ठ क्र.Ward-C-स्पील ५३ वर " नाला सफाई खर्च " लेखाशिर्षा खाली अ.क्र.३ वर औरंगाबाद टाईम्स कॉ.येथे R.C.C. नाल्याची संरक्षित भिंत बांधणे.-१०.०० लक्ष रु. | नेहरुनगर वार्डामध्ये विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणे. -१०.०० लक्ष रुपये. |
| ३) वार्ड क मधील पृष्ठ क्र.Ward-C-स्पील ५६ "शहरी भागात रस्ते दुरुस्ती पॅचवर्क " लेखाशिर्षा खाली अ.क्र.१६ वर वार्ड क्र.२८ अंतर्गत गल्ल्यामधील माती उचलणे.-५.०० लक्ष रु. | १) वार्ड क्र.२८ मध्ये विविध ठिकाणी बोरींग करुन हातपंप बसविणे.३-०० लक्ष रुपये<br>२) वार्ड क्र.२८ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज दुरुस्ती देखभाली ची फुटकळ कामे करणे.-२.०० लक्ष रुपये. |
| ४) वार्ड क मधील स्पील ओव्हर कामे पृष्ठ क्र.Ward-C-स्पील ६४ वर अ.क्र.४ वर R.C.C.पुल बांधणे.-३०.०० लक्ष | १) वार्ड क्र.२८ नेहरुनगर येथे विविध ठिकाणी डांबरीकरण करणे.-३०.०० लक्ष रुपये. |

| | |
|---|---|
| ५) वार्ड क मधील पृष्ठ क्र.Ward-C-स्पील-६४ वर नविन खडी रस्ते (शहरी भाग) अ.क्र.१ वर औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथे खडीकरण व कॉंक्रटींग करणे.-१०.०० लक्ष रु. | १) नेहरुनगर वार्डामध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणे.-७.५० लक्ष रुपये. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८५:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,औरंगाबाद शहरातील मनपा हद्दीतील कब्रस्तानात सध्या अनेक ठिकाणी वॉचमॅन नसल्याने कब्रस्तानात अनेक मोकाट जनवारे जात असल्याने कब्रस्तानाची पवित्रता नष्ट होत आहे तसेच मृत्यु प्रमाणपत्रासाठी कब्रस्तान दफन केल्याची नोंद असणे अनिवार्य झाल्याने शहरातील प्रत्येक कब्रस्तानात एक वॉचमॅन रुम बांधणे व प्रत्येक कब्रस्तानासाठी दोन वॉचमन नियुक्त करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक :डॉ.खान जफर अहेमद,श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद,
श्री.शेख हबीब शेख छोटु कुरेशी

अनुमोदक : श्री.अफसरखान यासीन खान, श्री.मोहम्मद मुजीबउद्दीन कदिरोद्दीन

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्यातप्रमाणे, शहरातील प्रत्येक कब्रस्तानात एक वॉचमॅन रुम बांधणे व प्रत्येक कब्रस्तानासाठी दोन वॉचमन नियुक्त करण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी

**विषय क्रमांक ८६:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील इदादा-ए-उर्दु ही एक नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असुन सन १९८७ पासुन साहित्याद्वारे व त्यांच्या कार्यातुन समाजामध्ये राष्ट्रीय एकात्मता पसरविण्याचे काम करीत आहे. यावर्षी सदरील संस्थेचे रौप्य महोत्सव असुन उर्दु साहित्यामध्ये जैन व शिख बांधवाचा सहभाग व उर्दु पत्रकारीतेचा दर्जा व महाराष्ट्र राज्यात त्याचे भविष्य या विषयावर दोन दिवसाचे राष्ट्रीयस्तराचे चर्चा सत्राचे व उर्दु साहित्यीक पत्राकरीता द्वारे राष्ट्रीय एकात्मतावर ऑल इंडिया मुशायराचे आयोजन दिनांक २९ व ३० डिसेंबर २०१२ रोजी आयोजन करावयाचे आहे. सदरील कार्यक्रमासाठी संस्थेस अंदाजे ०६ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

करीता औरंगाबाद शहरातील इदादा-ए-उर्दु ही या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस त्यांचे उपरोक्त कार्यक्रम आयोजनासाठी महानगरपालिकेतर्फे रक्कम रुपये ०३ लक्ष आर्थिक मदत करण्यासाठी मदत करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : डॉ.खान जफर अहेमद, श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद

अनुमोदक : श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव, श्री.अफसरखान यासीन खान,

**संवाद:**

श्री.गिरजाराम हळनोर :आर्थीक परीस्थिती विचारात घेवून या संस्थेला जास्तीत जास्त मदत देण्यात यावी.

मा.महापौर :मनपाची आर्थीक परीस्थिती विचारात घ्यावी नियमाप्रमाणे आर्थीक मदत करावी.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील इदादा-ए-उर्दु ही एक नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असुन संस्थेचे रौप्य महोत्सव असुन उर्दु साहित्यामध्ये जैन व शिख बांधवाचा सहभाग व उर्दु पत्रकारीतेचा दर्जा व महाराष्ट्र राज्यात त्याचे भविष्य या विषयावर दोन दिवसाचे राष्ट्रीयस्तराचे चर्चा सत्राचे व उर्दु साहित्यीक पत्राकरीता द्वारे राष्ट्रीय एकात्मतावर ऑल इंडिया मुशायराचे दिनांक २९ व ३० डिसेंबर २०१२ रोजी आयोजनासाठी रक्कम रुपये ०३ लक्षची आर्थिक मदत करण्यासाठी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेवून या संस्थेला जास्तीत जास्त नियमाप्रमाणे आर्थिक मदत देण्यास मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८७:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद सिडको एन-४,सेक्टर भागातील युवा खेळाडु राशिद शेख शकील शेख याने सॉफ्ट टेनिस क्रीडा प्रकारात भारतात राष्ट्रीय स्तरावर ५० पदके जिंकणारा एकमेव खेळाडु आहे. दिनांक १४ ते २१ नोव्हेंबर २०१२ चिन तैपाई येथे झालेल्या स्पर्धेत त्याने रौप्य पदक देशासाठी जिंकलेला असुन कोरिया येथे होणाऱ्या एशियन गेम्ससाठी भारतीय खेळाडु म्हणुन त्याची निवड झालेली आहे.

चिन तैपाई येथे झालेल्या स्पर्धेसाठी राशिद शेख याला रक्कम रुपये १,५०,०००/- पर्यंत खर्च झालेला आहे. संबंधीताची आर्थिक परिस्थिती व युवा खेळाडुस पुढील कोरीया येथील एशियन गेम्ससाठी मदत म्हणुन मनपा तर्फे रक्कम रुपये ५०,०००/- आर्थिक मदत करण्याकरीता प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : डॉ.खान जफर अहेमद अनुमोदक : श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद

मा.महापौर : नियमानुसार आर्थिक मदत करण्यांत यावी.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद सिडको एन-४,सेक्टर भागातील युवा खेळाडु राशिद शेख शकील शेख यांची कोरिया येथे होणाऱ्या एशियन गेम्ससाठी भारतीय खेळाडु म्हणुन त्याची निवड झाल्याने त्यास एशियन गेम्ससाठी मदत म्हणुन मनपा तर्फे रक्कम रुपये ५०,०००/- आर्थिक मदत देण्याकरिता नियमानुसार कार्यवाही करण्यांस मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८८:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०९ नंदनवन कॉलनी येथील स्वामी विवेकानंद इंग्लीश स्कुल समोरील मनपाच्या खुल्या जागेवर छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनावर बसलेला पुर्णाकृती पुतळा बसविणे बाबत दि. ३०/११/२०१२ (दि.१९/११/२०१२ ची तहकुब ) रोजीच्या सभेत ठराव क्र.२५ नुसार मंजुरी प्राप्त झालेली आहे.

सदर पुतळा उभारणीचे काम त्वरीत हाती घेण्याचे दृष्टीने पुतळयाचा परिसर विकसीत करुन सुशोंभिकरण करणे व पुतळा उभारणे करीता सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पातील पृष्ठ क्र. E-५८ अ.क्र.३१ अतिक्रमण निष्काषित केलेल्या विकास योजने अंतर्गत रस्त्याचे बांधणी करणे या लेखाशिर्षातील र.रु. १०.०० कोटी तरतुदी मधुन र.रु. ४०.०० लक्ष तरतुद वळती करणेस्तव प्रस्ताव सर्व साधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे, श्री.जैन विकास रतनलाल

अनुमोदक: श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत,श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ,
श्री.शिंदे राजू रामराव, श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड,
श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली श्री.खेडकर सुशिल तुकाराम,
श्री.समीर सुभाष राजुरकर, डॉ.खान जफर अहेमद

श्री.काशिनाथ कोकाटे :नवीन माईक बसविले परंतु कोण काय बोलत आहे ऐकायला येत नाही माईक चागल्या प्रकारे दुरूस्त करावे.

मा.महापौर :पुढील बैठकी पर्यंत माईकची दुरुस्ती करावी स्पष्ट आवाज येईल यासाठी योग्य कार्यवाही करावी. हा विषय मंजूर

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०९ नंदनवन कॉलनी येथील स्वामी विवेकानंद इंग्लीश स्कुल समोरील मनपाच्या खुल्या जागेवर छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनावर बसलेला पुर्णाकृती पुतळा बसविण्यासाठी व पुतळा उभारणीचे काम त्वरीत हाती घेण्याचे दृष्टीने पुतळयाचा परिसर विकसीत करुन सुशोंभिकरण करणे व पुतळा उभारणे करीता सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पातील पृष्ठ क्र. E-५८ अ.क्र.३१ अतिक्रमण निष्काषित केलेल्या विकास योजने

अंतर्गत रस्त्याचे बांधणी करणे या लेखाशिर्षातील र.रु. १०.०० कोटी तरतुदी मधुन र.रु. ४०.०० लक्ष तरतुद वळती करण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यांस मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८९:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,सदर रस्ते अत्यंत खराब झालेले असून पावसाळयामध्ये सकल भागातील रस्ते असल्याने पाणी खुप वहात असते.त्यामुळे पावसाळयामध्ये वहातूक विस्कळीत होत असते. तरी सदर सिमेंट कॉंक्रिट रस्ते हे डिफर पध्दतीने करण्यास मंजुरी होणे आवश्यक आहे.

१. एन-११ सिडको हेल्प सेंटर ते यादवनगर १५ मिटर सिमेंट कॉक्रिट रस्ता
२. एन-७ हॉटेल सनी ते ओंकार गॅस १५ मिटर सिमेंट क्रॉंकिट रस्ता
३. एन-८ हॉस्पीटल ते बजरंग चौका पर्यत सिमेट क्रॉंकिट रस्ता
४. एन-५ स्टेट बॅक ऑफ इंडीया ते सेंट्रल नाका सिमेंट क्रॉंकिट रस्ता
५. एन-४ मधील सिमेंट क्रॉंकिट रस्ता

तरी वरील सिमेंट क्रॉंकिट रस्ते डिफर पध्दतीने करण्यास मंजुरी मिळावी करीता प्रस्ताव दाखल करत आहे.

सुचक : श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ, श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड,
अनुमोदक : श्री.राजगौरव हरिदास वानखेडे, श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम,

**संवाद:**

| | |
|---|---|
| श्रीमती प्राजक्ता भाले | :यात क्र. ३ मध्ये बजरंग चौक ते बळीराम पाटील हायस्कूल असा रस्ता घेण्यात यावा.अशी दुरूस्ती करावी. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :जी सुचना केली त्याप्रमाणे रस्ते घ्यावे परंतु यापूर्वीचे डिफर पेमेंन्टवरील रस्ते अगोदर करावे त्यानंतर हे रस्ते घ्यावे. |
| मा.महापौर | :स.सदस्या श्रीमती भाले यांनी केलेली सूचने प्रमाणे रस्ता यात घेणे व यापूर्वी डिफर पेमेंन्टवर घेतलेले रस्ते अगोदर हाती घ्यावे.विषय मंजूर |

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सभागृहतील चर्चेनुसार

१. एन-११ सिडको हेल्प सेंटर ते यादवनगर १५ मिटर सिमेंट कॉक्रिट रस्ता
२. एन-७ हॉटेल सनी ते ओंकार गॅस १५ मिटर सिमेंट क्रॉंकिट रस्ता
३. एन-८ हॉस्पीटल ते बजरंग चौका पर्यत सिमेट क्रॉंकिट रस्ता
४. एन-५ स्टेट बॅक ऑफ इंडीया ते सेंट्रल नाका सिमेंट क्रॉंकिट रस्ता
५. एन-४ मधील सिमेंट क्रॉंकिट रस्ता तसेच क्र. ३ मध्ये बजरंग चौक ते बळीराम पाटील हायस्कूल असा रस्ता घेण्यास व सदर रस्ते सिमेंट क्रॉंकिट रस्ते डिफर पध्दतीने करण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९०:**

१. प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कोकणवाडी चौक ते अदालत रस्ता या महामार्गास सिध्दी विनायक मार्ग असे नाम करण करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या अवलोकनास्तव तथा मान्यतेस्तव सादर.

२. प्रस्ताव सादर करण्यांत येतो की प्रभाग क्र.६३ अंतर्गत कोकणवाडी प्रभागातील आजुबाजुच्या भागात महानगरपालिकेचे एकही आरोग्य केंद्र उपलब्ध नसल्याने येथील स्थानिक गोरगरीब नागरीकांचे आरोग्य सुस्थितीत राहाने करिता आरोग्य केंद्र उभारणे

सुचक : श्री.विजय लक्ष्मणराव वाघचौरे
अनुमोदक : श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत, श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, १) कोकणवाडी चौक ते अदालत रस्ता या महामार्गास सिध्दी विनायक मार्ग असे नाम करण करण्यास व २) प्रभाग क्र.६३ अंतर्गत कोकणवाडी प्रभागात आरोग्य केंद्र उभारण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**वियष क्रमांक ९१:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, क्रांतीचौक येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उड्डाण पुलाच्या बांधकामामुळे झाकुन गेलेला आहे. उड्डाण पुलाचा आराखडा तयार करतांना शिवाजी महाराजांच्या पुतळयाची उंची वाढविण्यांत येईल,असे निश्चित झालेले होते. परंतु प्रत्यक्षात या बाबीची अंमलबजावणी न झाल्यामुळे सदरील पुतळयाचे सौंदर्य झाकोळुन गेलेले आहे. पुतळा पूर्वीप्रमाणे चौकामध्ये स्पष्ट दिसावा व पुतळयाचे वैभव अबाधित रहावे याकरीता पुतळयाची उंची २०-२५ फुटाने वाढविण्यांत यावी. यासाठी लागणा-या खर्चाची तरतुद अर्थसंकल्पात करावी.

करीता प्रस्ताव मा.सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.शिंदे राजू रामराव, श्री.चौधरी संजय सांडू

अनुमोदक : श्री.समीर सुभाष राजुरकर, श्री.कावडे रवि साहेबराव

श्री.राजू शिंदे :हा ठराव प्रशासनाकडून येणे अपेक्षीत होते या शहराचे राज्याचे वैभव छत्रपती शिवाजी महाराज आहे यापेक्षाही २०-२५ फुट उंची वाढली पाहिजे.हा प्रस्ताव एक मताने मंजूर करावा ताबडतोब कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे.एक दोन महिण्यात काम पुर्ण करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :स.श्री. राजू शिंदे यांनी हा प्रस्ताव आणला त्यांचे अभिनंदन करतो.

श्री.राजू शिंदे :या पुतळयाची उंची वाढवावी तसेच या चौकाचे सुशोभिकरण करावे

श्री.रेणुकादास वैद्य : टेक्नीकली हे करता येत असेल तात्रिकदृष्टया करणे शक्य असेल तर तपासून कार्यवाही व्हावी.

श्री.राजू शिंदे :टेक्नीकली बघीतले तर या पुतळयाच्या बाजूला उड्डाणपुल करता येत नाही.उंची वाढवावी अशी आमची मागणी आहे

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी डायस समोर बोलत असतात.

श्री.मिलींद दाभाडे :या प्रस्तावानुसार छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळयाची उंची वाढली पाहिजे तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर व मिलकॉर्नर येथील शाहू महाराज औरंगपूरा येथील महात्मा फुले यांचे पुतळयाची ही उंची वाढविली पाहिजे.

मा.महापौर : या बाबत तांत्रिक दृष्टया तपासून योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :तांत्रिक दृष्टया काय तपासायचे आहे हा पुतळा महापालिकेच्या वतीने करण्यात आला आहे तो पुतळा तेथेच ठेवून उंची वाढविण्या संदर्भात रस्ते विकास महामंडळाशी चर्चा झाली त्यानंतर त्यास मान्यता दिली होती विषय कसा आला व कुणी दिला महत्व नाही त्या पुतळयाची उंची वाढली पाहिजे.

मा.महापौर :आपल्या भावना लक्षात घेवून निर्णय दिला सर्व तांत्रिक बाबी तपासून कार्यवाही होईल.

श्री.राजू शिंदे :तांत्रिक शब्द वगळावा. उंची वाढविली पाहिजे

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, क्रांतीचौक येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे सौंदर्य झाकोळुन गेलेले आहे. पुतळा पूर्वीप्रमाणे चौकामध्ये स्पष्ट दिसावा व पुतळयाचे वैभव अबाधित रहावे याकरीता पुतळयाची उंची २०-२५ फुटाने वाढविण्यांसाठी या बाबत तांत्रिक दृष्टया तपासून योग्य ती कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९२:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७८ चिकलठाणा अंतर्गत महानगरपालिकेचे आरोग्य केंद्र आहे. सदरील आरोग्य केंद्र उभारणीमध्ये तत्कालीन स.सदस्य कै.साहेबराव कावडे यांचे मोठे योगदान आहे.

तरी चिकलठाणा येथील मनपा आरोग्य केंद्रास " कै.साहेबराव कावडे आरोग्य केंद्र " असे नांव देण्यांत यावे. करीत प्रस्ताव मा. सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर .

सुचक : श्री.शिंदे राजू रामराव, श्री.चौधरी संजय सांडू

अनुमोदक : श्री.समीर सुभाष राजुरकर, डॉ.खान जफर अहेमद

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा येथील मनपा आरोग्य केंद्रास " कै.साहेबराव कावडे आरोग्य केंद्र " असे नांव देण्यांस मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ५७ येथील मोंढा परिसरातील जाफरगेट भागात सुमारे ४५० वर्ष जुनी सय्यद शहा सुल्तान खादर औलीया यांची दर्गा असुन महाराष्ट्र व इतर राज्यातुन सर्व समाजाचे भाविक या दर्ग्यात श्रध्देने येतात.

माझ्या वार्डातील मोंढा जाफरगेट येथील चौकास सय्यद शहा सुल्तान खादर औलीया चौक असे नांव देण्यास प्रस्ताव मा.सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर .

सुचक: श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर

अनुमोदक : डॉ.खान जफर अहेमद, श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५७ येथील मोंढा जाफरगेट येथील चौकास सय्यद शहा सुल्तान खादर औलीया चौक असे नांव देण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९४:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००९ ते २०१२ या चार वर्षात नगर रचना विभागाने मोठे मोठे समूह गृहनिर्माण योजना ( Group Housing ) व मोठे व्यापारी संकूल तसेच मोठ मोठे रहिवासी प्लॅट सिस्टीम यांची बांधकाम परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र मंजुर करताना मोठया प्रमाणावर नियम बाहय काम केले असून यामध्ये झालेले गैरव्यवहार,भ्रष्टाचार व महानगरपालिकाचे आर्थिक नुकसान शोधून काढणे आवश्यक आहे. नजिकच्या काळात TDR मंजूरीमध्ये सुध्दाही मोठया प्रमाणावर गैरव्यवहार झाला असल्याची शंका आहे. करिता प्रशासनातील पारदर्शकता कायम ठेवण्यासाठी व महापालिकेची जनतेमधील प्रतिमा स्वच्छ ठेवण्यासाठी याबाबत सखोल चौकशी घेणे आवश्यक आहे. करिता शासनाचे संचालक,नगर रचना,पुणे मार्फत चौकशी करणे.

करिता प्रस्तावास मान्यता देण्यात यावी. करिता प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

सुचक :श्री.बनकर कृष्णा सांडुजी, श्री.शिंदे राजू रामराव, श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
श्री.कावडे रवि साहेबराव,

अनुमोदक :श्री.कुचे नारायण तिलोकचंद, श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद

मा.महापौर : मुख्य लेखा परिक्षक यांनी सर्व संचिकाचे लेखापरिक्षण करुन अहवाल सादर करावा.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००९ ते २०१२ या चार वर्षात नगर रचना विभागाने मोठे मोठे समूह गृहनिर्माण योजना ( Group Housing ) व मोठे व्यापारी संकूल तसेच मोठ मोठे रहिवासी प्लॅट सिस्टीम यांची बांधकाम परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र मंजुर केले तसेच नजिकच्या काळात TDR मंजूरी मोठया प्रमाणावर देण्यात आली असून प्रशासनातील पारदर्शकता कायम

ठेवण्यासाठी व महापालिकेची जनतेमधील प्रतिमा स्वच्छ ठेवण्यासाठी याबाबत सखोल चौकशी होण्यासाठी मुख्य लेखापरिक्षक यांनी सर्व संचिकाचे लेखापरिक्षण करुन अहवाल सादर करण्यांस मंजुरी देण्यांत आली, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९५:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, येणा-या सर्व साधारण सभेमध्ये आंसद स्वरुप बहुद्देशीय सेवाभावी संस्था व महीला आयोग दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी कायदे विषय माहितीसाठी कार्यशाळेचे आयोजन २३/१२/२०१२ रोजी करण्याचे ठरले आहे. या कामासाठी रु. २ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. करिता महानगरपालिके कडून १ लक्ष रु. ची आर्थिक मदत करण्यात यावी.

सुचक : श्रीमती रेखा अजित जैस्वाल

अनुमोदक : डॉ.खान जफर अहेमद, श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद

मा महापौर : नियमानुसार आर्थीक मदत देण्यात यावी.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आंसद स्वरुप बहुद्देशीय सेवाभावी संस्था व महीला आयोग दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी कायदे विषय माहितीसाठी कार्यशाळेचे आयोजन २३/१२/२०१२ रोजी करण्याचे ठरले या कामासाठी रु. २ लक्ष इतका खर्च अपेक्षित असुन महानगरपालिके कडून १ लक्ष रु. ची आर्थिक मदत देण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९६:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, लेखाशिर्ष बदला बाबतचा खालील प्रस्ताव येत्या सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा ही नम्र विनंती.

| अ.क्र | अंदाजपत्रकातील अ.क्र मुळ काम | रक्कम | | सुधारित काम | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्र वार्ड -ई स्पील १०५ वर नविन कॉक्रींट रस्ते शहरी भाग लेखाशिर्षा अंतर्गत अ.क्र.५३ वार्ड क्र.७० प्रेरणानगर मधील रस्त्यावर सिमेंट कॉक्रींट करणे या कामा ऐवजी | ०५ लाख | १ | प्रभाग क्र.७० मध्ये विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे | ०५ लाख |

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्येतस्तव सादर.

सुचक : श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर अनुमोदक : श्री.अनिल जुगललाल जैस्वाल

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, खालील लेखाशिर्ष सुधारीत कामासाठी बदलण्यांस मंजुरी देण्यांत येते,

| अ.क्र | अंदाजपत्रकातील अ.क्र मुळ काम | रक्कम | | सुधारित काम | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्र वार्ड -ई स्पील १०५ वर | ०५ लाख | १ | प्रभाग क्र.७० मध्ये विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे | ०५ लाख |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | नविन कॉक्रींट रस्ते शहरी भाग लेखाशिर्षा अंतर्गत अ.क्र.५३ वार्ड क्र.७० प्रेरणानगर मधील रस्त्यावर सिमेंट कॉक्रींट करणे या कामा ऐवजी | | | | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९७ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.७० विद्यानगर अंतर्गत जयभवानी हौसिंग सोसायटी येथे मनपा शाळेच्या बाजूला महानगरपालिकेच्या मालकीच्या खुल्या जागेवर सुसज्ज सर्व सोयींनीयुक्त अद्यावत दोन मजली बहुउद्देशिय केंद्राची इमारत बांधण्यात यावी. जेणे करुन सदरील परिसरातील नागरिकांना त्याचा विविध उपक्रमासाठी उपयोग करता येईल. सदरच्या कामासाठी अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध आहे.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम, अनुमोदक : डॉ.खान जफर अहेमद

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७० विद्यानगर अंतर्गत जयभवानी हौसिंग सोसायटी येथे मनपा शाळेच्या बाजूला महानगरपालिकेच्या मालकीच्या खुल्या जागेवर सुसज्ज सर्व सोयींनीयुक्त अद्यावत दोन मजली बहुउद्देशिय केंद्राची इमारत बांधण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९८:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका मनपा अर्थसंकल्प २०१२-२०१३ वार्ड क्र.९८ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यांत यावा, म्हणुन प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| पान क्र | २०१२-२०१३ मधील लेखशिर्ष | या कामासाठी लेखाशिर्ष बदलुन वळती करणे |
|---|---|---|
| १.वार्ड फ स्पील -१३५ अ.क्र.११ | वार्ड क्रं.९८ गट क्रं.१९ कांचनवाडी येथे जलनिःसारण वाहीनी टाकणे आर्थिक तरतुद ०५.०० लक्ष | १.वार्ड क्रं.९८ कांचनवाडी स्मशान भुमी कडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे. या कामासाठी सदरील आर्थिक तरतुद वळती करण्यांत यावी |

सुचक : श्री.गायकवाड रावसाहेब धोंडीराम अनुमोदक : डॉ.खान जफर अहेमद

**<u>ठराव</u>**:

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका अर्थसंकल्प २०१२-२०१३ वार्ड क्र.९८ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष वळती करण्यांस मंजुरी देण्यांत येते,

| पान क्र | २०१२-२०१३ मधील लेखशिर्ष | या कामासाठी लेखाशिर्ष बदलुन वळती करणे |
|---|---|---|
| १.वार्ड फ स्पील -१३५ अ.क्र.११ | वार्ड क्रं.९८ गट क्रं.१९ कांचनवाडी येथे जलनिःसारण वाहीनी टाकणे आर्थिक तरतुद ०५.०० लक्ष | १.वार्ड क्रं.९८ कांचनवाडी स्मशान भुमी कडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे. या कामासाठी सदरील आर्थिक तरतुद वळती करण्यांत यावी |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९९:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.२२ नारेगांव स्लम हा पुर्वी ग्रामपंचायत असतांना या गावचे पोलिस पाटील कै.मानिकराव गणपतराव दहिहंडे हे होते त्यांनी आपल्या जीवनात सामाजीक कार्य, गावातील गोरगरीब नागरीकांना स्वखर्चाने घरे बांधुन दिली त्यात भटके विमुक्त आदीवाशी, मागासवर्गीयांचा समावेश आहे अशा या थोर व्यक्तीचा ठसा या परीसरात रहाणाऱ्या नागरीकांमध्ये अद्यापही कायम आहे.

अशा या थोर व्यक्तीमत्व असलेल्या कै.माणिकराव पाटील दहिहंडे प्रवेशद्वार रेडीयंट ॲग्रो केमीकल प्रा.ली. व ग्लेट लेजर या दोन्ही कंपन्याच्या मधुन जाणारा मुख्य रस्ता जय भवानीचौक ते वरुड मार्गे शेंद्रा एमआयडीसी कडे जाणाऱ्या रस्त्यास कै.माणिकराव पाटील दहिहंडे असे नामकरण करण्यात यावे. प्रस्ताव सर्वसाधारण सभेस तांत्रीक मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत, श्री.जैन विकास रतनलाल, डॉ.खान जफर अहेमद

अनुमोदक : श्री.गादगे विरभद्र रामलींग, श्री. कुलकर्णी गोपाळ शरदराव

या वेळी अनेक स.सदस्य डायस समोर येवून मोठमोठयाने बोलत असतात

मा.महापौर :सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे विषय पत्रिका संपल्यानंतर चर्चा करीता वेळ दिला जाईल.९९ मंजूर

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रेडीयंट ॲग्रो केमीकल प्रा.ली. व ग्लेट लेजर या दोन्ही कंपन्याच्या मधुन जाणारा मुख्य रस्ता जय भवानीचौक ते वरुड मार्गे शेंद्रा एमआयडीसी कडे जाणाऱ्या रस्त्यास वार्ड क्र.२२ नारेगांव येथील थोर व्यक्तीमत्व असलेल्या कै.माणिकराव पाटील दहिहंडे यांचे नामकरण करण्यास मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्प पुस्तिकात वार्ड क्र.२९ विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करणे रक्कम रु. १०.०० लाख पान क्र. GBR-Ward -C New Work -१९ वर आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | सुधारित काम (लेखाशिर्षक बदल) |
|---|---|---|
| १ | सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्प पुस्तिकात वार्ड क्र.२९ विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करणे रक्कम रु.१०.०० लाख पान क्र. GBR-Ward-C New Work -१९ | १) वार्ड क्र. २९ अंतर्गत मोहम्मदी मस्जिद जवळ ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे रु. २.५० लाख<br>२) वार्ड क्र. २९ अंतर्गत गणेश कॉलनी येथे रोहीत किराणा दुकानाजवळ ड्रेनेज लाईनची दुरुस्ती करणे रु. २.५० लाख.<br>३) वार्ड क्र. २९ मध्ये विविध ठिकाणी विद्युत कामे करणे (फुटकळ) रु.२.०० लाख<br>४) वार्ड क्र. २९ मध्ये एसटी कॉलनी येथे दर्गाजवळ ड्रेनेज लाईन टाकणे रु. १.०० लाख<br>५) वार्ड क्र.२९ अंतर्गत मेनहोल दुरुस्ती करणे जलनि:सारण वाहीणी दुरुस्ती करणे, शहाबादी दुरुस्ती करणे कॉक्रेट रस्ता इत्यादी आवश्यक नुसार फुटकळ कामे करणे रु. २.०० लाख |

तरी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती जरीना म.जावेद, अनुमोदक : श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर

**ठराव:**

महानगरपालिका सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्प पुस्तिकात वार्ड क्र.२९ विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करण्यासाठी रक्कम रु. १०.०० लाख खालील सुधारीत कामासाठी वळती करण्यांस मंजुरी देण्यांत येते,

| अ.क्र. | कामाचे नांव | सुधारित काम (लेखाशिर्षक बदल) |
|---|---|---|
| १ | सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्प पुस्तिकात वार्ड क्र.२९ विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करणे रक्कम रु.१०.०० लाख पान क्र. GBR-Ward-C New Work -१९ | १) वार्ड क्र. २९ अंतर्गत मोहम्मदी मस्जिद जवळ ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे रु. २.५० लाख<br>२) वार्ड क्र. २९ अंतर्गत गणेश कॉलनी येथे रोहीत किराणा दुकानाजवळ ड्रेनेज लाईनची दुरुस्ती करणे रु. २.५० लाख.<br>३) वार्ड क्र. २९ मध्ये विविध ठिकाणी विद्युत कामे करणे (फुटकळ) रु.२.०० लाख<br>४) वार्ड क्र. २९ मध्ये एसटी कॉलनी येथे दर्गाजवळ ड्रेनेज लाईन टाकणे रु. १.०० लाख<br>५) वार्ड क्र.२९ अंतर्गत मेनहोल दुरुस्ती करणे जलनि:सारण वाहीणी दुरुस्ती करणे, शहाबादी दुरुस्ती करणे कॉंक्रेट रस्ता इत्यादी आवश्यक नुसार फुटकळ कामे करणे रु. २.०० लाख |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.६९ जवाहर कॉलनी प्रभागातील अर्थसंकल्प सन २०१२-२०१३ मधील खालील दर्शविलेल्या कामांची रक्कम प्रभागातील रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामासाठी वळती करण्यात यावी हि नम्र विनंती.

१. वार्ड क्र. ६९ विविध ठिकाणी जलनि:सारण वाहिनी टाकणे - रु. १०.०० लक्ष
(भांडवली कामे जलनि:सारण स्पील अ.क्र. ६ पान १३५)
२. वार्ड क्र. ६९ जवाहर कॉलनी येथे ड्रेनेज लाईनची दुरुस्ती करणे - रु.५.०० लक्ष
(महसुली खर्च देखभाल दुरुस्ती स्पील अ.क्र. ५२ पान १२२)
३. वार्ड क्र. ६९ त्रिमुर्ती चौक येथील रस्त्यावरील डी.पी.स्थलांतरीत करणे - ५.०० लक्ष
(विद्युत देखभाल दुरुस्ती अ.क्र. ४ पान ११८)
४. वार्ड क्र. ६९ शास्त्री नगर उद्यानात जॉगिंग ट्रॅक बांधणे - ६.०० लक्ष
(नविन उद्याने अ.क्र. ११ पान १४१)
५. वार्ड क्र. ६९ विविध ठिकाणी ड्रेनेज लाईनची कामे करणे - १०.०० लक्ष
( भांडवली कामे जलनि:सारण शहर नविन अ.क्र. ४ पान ४५) एकुण रु.३६.०० लक्ष

सुचक: श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव
अनुमोदक : श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत, श्री.खान अक्रम करीम खान
मा.महापौर :मंजूर

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६९ जवाहर कॉलनी प्रभागातील अर्थसंकल्प सन २०१२-२०१३ मधील खालील दर्शविलेल्या कामांची रक्कम प्रभागातील रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामासाठी वळती करण्यास मंजुरी देण्यात येते,

१. वार्ड क्र. ६९ विविध ठिकाणी जलनि:सारण वाहिनी टाकणे - रु. १०.०० लक्ष
(भांडवली कामे जलनि:सारण स्पील अ.क्र. ६ पान १३५)

२. वार्ड क्र. ६९ जवाहर कॉलनी येथे ड्रेनेज लाईनची दुरुस्ती करणे - रु.५.०० लक्ष
(महसुली खर्च देखभाल दुरुस्ती स्पील अ.क्र. ५२ पान १२२)
३. वार्ड क्र. ६९ त्रिमुर्ती चौक येथील रस्त्यावरील डी.पी.स्थलांतरीत करणे - ५.०० लक्ष
(विद्युत देखभाल दुरुस्ती अ.क्र. ४ पान ११८)
४. वार्ड क्र. ६९ शास्त्री नगर उद्यानात जॉगिंग ट्रॅक बांधणे - ६.०० लक्ष
(नविन उद्याने अ.क्र. ११ पान १४१)
५. वार्ड क्र. ६९ विविध ठिकाणी ड्रेनेज लाईनची कामे करणे - १०.०० लक्ष
( भांडवली कामे जलनि:सारण शहर नविन अ.क्र. ४ पान ४५) एकुण रु.३६.०० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०२:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, नारेगांव वसाहती मध्ये प्रवेश करण्यासाठी फक्त मुख्य रस्ता वरुडकडे जाणारा आहे. नारेगावच्या तिन्ही बाजुनी एमआयडीसी एरिया व एका बाजुनी सुकना नदी आहे. एमआयडीसीने अनिल केमीकल पासुन दक्षिणेकडे पॉलीकॉप कंपनीपर्यंत नारेगांव वस्ती पर्यंत १० मी रुंद रस्ता ठेवलेला आहे. मात्र त्या रस्त्याच्या मध्ये दोन घरे बाधीत असल्यामुळे हा रस्ता बंद आहे. रस्त्यातील आडसर दुर केल्यास हा रस्ता नागरीकांना वापरात येईल व नारेगांव येथील नागरीकांची अडचण दुर होईल. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत

अनुमोदक : श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने, श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नारेगांव वसाहती मध्ये प्रवेश करण्यासाठी एमआयडीसीने अनिल केमीकल पासुन दक्षिणेकडे पॉलीकॉप कंपनीपर्यंत नारेगांव वस्ती पर्यंत १० मी रुंद रस्ता ठेवलेला असून रस्त्यामध्ये दोन घरे बाधीत असल्याने रस्ता बंद असून हा रस्ता नागरीकांना वापरात येण्यासाठी रस्त्यातील आडसर दुर करण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०३:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहरातील जालना रोड वरील लेमन - ट्री हॉटेल ते चिकलठाणा रोडवर हरितपट्टयात अतिक्रमणे वाढत असून त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून नागरीकांना याचा अतिशय त्रास होत असून सदरील रस्त्याच्या हरित पट्टयाचे सुशोभिकरण करावे करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.बेहडे अशोक किसनराव अनुमोदक : श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील जालना रोड वरील लेमन - ट्री हॉटेल ते चिकलठाणा रोडवर हरितपट्टयात अतिक्रमणे वाढत असून सदरील रोडवर हरितपट्टयाचे सुशोभिकरण करण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र. ३३ गुलमंडी येथील विकास कामासाठी अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यात आलेली असुन खालील कामाऐवजी सुधारीत कामासाठी तरतुद ठेवण्यात येवुन कामा हाती घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| | प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|---|
| १. | अर्थसंकल्प २०१२-२०१३ वार्ड डी-स्पील ९२ अ.क्र. २ वर वार्ड क्र.३३ गुलमंडी येथील विविध गल्ल्यामधील जुनी जलवाहिणी बंद करुन नवीन १०० मि.मि.व्यासाची डीआयके-७ जलवाहिणी टाकणे रु.६.९० लक्ष | वार्ड क्र.३३ अंतर्गत विविध ठिकाणी बोरवेल खोदुन हात पंप बसविणे रु. ६.९० लक्ष |

सुचक : श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार. अनुमोदक : श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ३३ गुलमंडी येथील विकास कामासाठी अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यात आलेली असुन प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुधारीत कामास मंजुरी देण्यांत येते,

| | **प्रस्तावित विकास काम** | **सुधारीत विकास काम** |
|---|---|---|
| १. | अर्थसंकल्प २०१२-२०१३ वार्ड डी-स्पील ९२ अ.क्र. २ वर वार्ड क्र.३३ गुलमंडी येथील विविध गल्ल्यामधील जुनी जलवाहिणी बंद करुन नवीन १०० मि.मि.व्यासाची डीआयके-७ जलवाहिणी टाकणे रु.६.९० लक्ष | वार्ड क्र.३३ अंतर्गत विविध ठिकाणी बोरवेल खोदुन हात पंप बसविणे रु. ६.९० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०५:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र. ५५ मधील विकास कामासाठी सन २०१२-१३ या अर्थसंकल्पात ठेवण्यात आलेली आहे. खालील कामाऐवजी सुधारित कामासाठी तरतूद ठेवण्यात येवून काम हाती घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | प्रस्तावित कामाचे नांव | सुधारित कामाचे नांव |
|---|---|---|
| १) | मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेले वार्ड -क अंतर्गत सन २०१२-१३ मधील पेज क्र. GBR-Ward C New work अ.क्र. ८ रु. १०.०० लक्ष | वार्ड क्र. ५५ कैसर कॉलोनी येथे ट्रिमिक्स सिमेंट रस्त्याचे काम करणे रु. १०.०० लक्ष. |

सुचक : श्री.शहनवाज खां रहेमान अनुमोदक : डॉ.खान जफर अहेमद

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ५५ मधील विकास कामासाठी सन २०१२-१३ या अर्थसंकल्पात ठेवण्यात आलेली तरतुद खालील सुधारित कामासाठी वळती करण्यास मंजुरी देण्यांत येते,

| अ.क्र. | प्रस्तावित कामाचे नांव | सुधारित कामाचे नांव |
|---|---|---|
| १) | मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेले वार्ड -क अंतर्गत सन २०१२-१३ मधील पेज क्र. GBR-Ward C New work अ.क्र. ८ रु. १०.०० लक्ष | वार्ड क्र. ५५ कैसर कॉलोनी येथे ट्रिमिक्स सिमेंट रस्त्याचे काम करणे रु. १०.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०६:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, 'जिन्सी चौक' ऐवजी "कै.अब्दुल रहेमान जिन्सी चौक" असे नामंतर करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर ठेवून मंजूर करणे बाबत.

| अ.क्र. | प्रस्तावित नांव | सुधारित नांव |
|---|---|---|
| १) | हजाम गल्ली जिन्सी | हजरत निजामोद्दीन गल्ली जिन्सी |
| २) | जिन्सी चौक | कै.अब्दूल रहेमान जिन्सी चौक |

सुचक : श्री.शहनवाज खां रहेमान अनुमोदक : डॉ.खान जफर अहेमद

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हजाम गल्ली जिन्सी ऐवजी सुधारीत नांव हजरत निजामोद्दीन गल्ली जिन्सी तसेच जिन्सीचौक या नांवा ऐवजी सुधारीत कै.अब्दूल रहेमान जिन्सी चौक असे नांव देण्यांस मंजुरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०७:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र. ०७ भिमनगर भावसिंगपुरा ही वसाहत किमान ९० टक्के दलित वसाहत आहे. शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत आजपर्यंत या वॉर्डासाठी कुठल्याही प्रकारची आर्थिक तरतुद मनपा प्रशासनातर्फे करण्यात आलेली नाही.

करीता शासनाकडून प्राप्त होणाऱ्या दलित वस्ती सुधार योजनेतंर्गत वॉर्ड क्र. ०७ भिमनगर भावसिंगपुरा या वसाहतीतील विविध विकास कामे करण्यांकरीता र.रु.५० लक्षाची आर्थिक तरतुद करण्यांत यावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.बनकर कृष्णा सांडुजी		अनुमोदक : श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र. ०७ भिमनगर भावसिंगपुरा दलित वसाहत असुन शासनाकडून प्राप्त होणाऱ्या दलित वस्ती सुधार योजनेतंर्गत या वसाहतीतील विविध विकास कामे करण्यांकरीता र.रु.५० लक्षाची आर्थिक तरतुद करण्यांस मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०८:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे माझ्या स्वेच्छानिधीमधून रुग्णांसाठी व रुग्णांच्या नातेवाईकासाठी पाणपोई बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे. या पाणपोईमुळे येथील नागरीकांची होणारी गैरसोय दुर होणार आहे. तसेच या पाणपोईसाठी व पाणपोईच्या परिसराचे सुशोभिकरण करण्यांत येत आहे, त्यास लागणारा वाढीव खर्च र.रु.१,५०,०००/- माझ्या स्वेच्छानिधी मधुन खर्च करण्यांत येणार आहे. त्यास मंजुरी देण्यांत यावी. तसेच या बांधण्यात आलेल्या पाणपोईस "बौध्दवासी सुंदराआई सांडुजी बनकर यांच्या स्मरणार्थ पाणपोई" असे नांव देण्यांत यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.बनकर कृष्णा सांडुजी		अनुमोदक : श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे माझ्या स्वेच्छानिधीमधून रुग्णांसाठी व रुग्णांच्या नातेवाईकासाठी पाणपोई बांधण्याचे काम प्रगतीपथावर असुन पाणपोईच्या परिसराचे सुशोभिकरण करण्यांत येत आहे, त्यास लागणारा वाढीव खर्च र.रु.१,५०,०००/- माझ्या स्वेच्छानिधी मधुन खर्च करण्यांस तसेच या बांधण्यात आलेल्या पाणपोईस "बौध्दवासी सुंदराआई सांडुजी बनकर यांच्या स्मरणार्थ पाणपोई" असे नांव देण्यांस मंजुरी देण्यात येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, जालना रोड वरील पगारीया ॲटो शेजारी महानगरपालिकेची जागा असुन सदरील ५४ स्क्वे.मी. जागा रेमण्ड शो रुम मागील पाच ते सहा वर्षा पासुन वापरत आहे. त्यामळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.तरी सदरील महानगरपालिकेची ५४ स्क्वे.मि.जागा रेमण्ड शो रुम कडून त्वरीत ताब्यात घेण्यात यावी . व मागील पाच ते सहा वर्षाचे बाजार भावानुसार भाडे संबंधित शो रुम च्या मलकाकडून व्याजासह वसुलीचे आदेश देण्यात यावेत करीता प्रस्ताव मा. सर्व साधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर .

सुचक : श्री.बेहडे अशोक किसनराव		अनुमोदक : श्री.अफसरखान यासीन खान

श्री.मिलींद दाभाडे :सर्व मंजूर करावे ,चर्चा करावी.

श्री.गिरजाराम हाळनोर :सर्व सदस्यांचे विषय आहे मंजूरी दयावी.

श्री.राजू शिंदे :ऐनवेळचे विषय घेवू नये.

श्री.रेणुकादास वैद्य :सर्व विषय मंजूर करावे असे सर्वाचे मत आहे मंजूर करावे.

**मा.महापौर :जे जे विषय आहे ते सर्व मंजूर ऐनवेळचे मंजूर**

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जालना रोड वरील पगारीया ॲटो शेजारी सदरील महानगरपालिकेची ५४ स्क्वे.मि.जागा रेमण्ड शो रुम वापरत असल्याने ती जागा त्यांच्याकडून ताब्यात घेणे व पाच ते सहा वर्षाचे भाडे बाजार भावानुसार व व्याजासह रक्कम शोरुम च्या मालकाकडून वसुल करण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११०:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अगामी सर्व साधारण सभेत सन २०१२-२०१३ च्या अर्थसंकल्पातील खालील कामे रद्य करुन प्रभागात आवश्यक असणारी दुसरी विकास कामे करणे बाबत लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा. सर्व साधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर .

| अ.क्र. | रद्य करावयाचे कामाचे नांव | करावयाचे कामाचे नांव |
|---|---|---|
| १ | सन २०१२-२०१३ च्या अर्थ संकल्पात वार्ड अ नविन कामे पान क्र जी बीआर -०२ देखभाल व दुरुस्ती अ.क्र.०५ वर वार्ड क्र. १० अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे व ढापे टाकणे करीता र.रु.०८.०० लक्ष | १. प्रभाग क्र.१० टाऊन हॉल उड्डाण पुलाखाली पोलीस चौकी बांधणे ०२.५ लक्ष .<br>२. रोड वायंडींग मध्ये तोडण्यात आलेली पठाण समाजाच्या कब्रस्तानची भींत बांधणे व पेव्हर ब्लॉक बसविणे र.रु. ०२.५ लक्ष<br>३. जयसिंगपुरा परिसरातील विविध ठिकाणची नाली दुरुस्त करणे व ढापे टाकणे रु. ०३.०० लक्ष . |

सुचक : श्री.बेहडे अशोक किसनराव अनुमोदक : श्री.अफसरखान यासीन खान

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका अर्थसंकल्प २०१२-२०१३ मधील अर्थसंकल्पातील खालील कामे रद्य करुन प्रभागात आवश्यक असणारी प्रस्तावात नमूद केलेली विकासकामे करण्यासाठी लेखाशिर्ष बदलण्यांस मंजुरी देण्यांत येते,

| अ.क्र. | रद्य करावयाचे कामाचे नांव | करावयाचे कामाचे नांव |
|---|---|---|
| १ | सन २०१२-२०१३ च्या अर्थ संकल्पात वार्ड अ नविन कामे पान क्र जी बीआर -०२ देखभाल व दुरुस्ती अ.क्र.०५ वर वार्ड क्र. १० अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे व ढापे टाकणे करीता र.रु.०८.०० लक्ष | १. प्रभाग क्र.१० टाऊन हॉल उड्डाण पुलाखाली पोलीस चौकी बांधणे ०२.५ लक्ष .<br>२. रोड वायंडींग मध्ये तोडण्यात आलेली पठाण समाजाच्या कब्रस्तानची भींत बांधणे व पेव्हर ब्लॉक बसविणे र.रु. ०२.५ लक्ष<br>३. जयसिंगपुरा परिसरातील विविध ठिकाणची नाली दुरुस्त करणे व ढापे टाकणे रु. ०३.०० लक्ष . |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १११:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र. ६३ अंतर्गत क्रांतीनगर ही वसाहत असून दलित वसाहत आहे. शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत आजपर्यंत या वॉर्डासाठी कुठल्याही प्रकारची आर्थिक तरतुद मनपा प्रशासनातर्फे करण्यात आलेली नाही.

करीता शासनाकडून प्राप्त होणाऱ्या दलित वस्ती सुधार योजनेतंर्गत वॉर्ड क्र.६३ क्रांतीनगर या वसाहतीतील विविध विकास कामे करण्यांकरिता र.रु.१.०० कोटीची आर्थिक तरतुद करण्यांत यावी. व प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यांत यावा. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण, श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव

अनुमोदक: श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार, श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव, श्री. मालानी प्रफुल लालचंद

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासनाकडून प्राप्त होणाऱ्या दलित वस्ती सुधार योजनेतंर्गत वॉर्ड क्र.६३ क्रांतीनगर या वसाहतीतील विविध विकास कामे करण्यांकरिता र.रु.१.०० कोटीची आर्थिक तरतुद करण्यास व प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यांस मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११२:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.८३ पुंडलिकनगर या वॉर्डासाठी अर्थसंकल्प सन २०१२-१३ मध्ये असलेल्या खालील कामांचे लेखाशिर्ष बदलण्यांत यावे.

| पान क्रमांक व अ.क्र. | कामाचे नांव (जूने लेखाशिर्ष) | सुधारीत लेखाशिर्ष |
|---|---|---|
| Ward -E Spill Page No.102 अ.क्र.3 | **पुतळे व देखभाल दुरुस्ती** वॉर्ड क्र.83 मधील विविध चौकांचे सुशोभिकरण करणे व इतर कामे करणे र.रु.15.00 लक्ष | वॉर्ड क्र.83 अंतर्गत गल्ली नं. 7 पुंडलिकनगर येथील उर्वरित रस्त्याचे कॉंक्रेटीकरण करणे र.रु. 7.00 लक्ष वळती करणे. |
| Ward -E Spill Page No. 95 अ.क्र.27 | **शहरी भागात रस्ते दुरुस्ती व पॅचवर्क** वॉर्ड क्र.83 येथील अस्तित्वात असलेल्या खडी रस्त्याची दुरुस्ती करणे र.रु. 3.00 लक्ष | वॉर्ड क्र.83 अंतर्गत गल्ली नं. 7 पुंडलिकनगर येथील उर्वरित रस्त्याचे कॉंक्रेटीकरण करणे र.रु. 3.00 लक्ष वळती करणे. |

करिता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक: श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव,

अनुमोदक : श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत, श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८३ पुंडलिकनगर या वॉर्डासाठी अर्थसंकल्प सन २०१२-१३ मध्ये असलेल्या खालील कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यांत येते,

| पान क्रमांक व अ.क्र. | कामाचे नांव (जूने लेखाशिर्ष) | सुधारीत लेखाशिर्ष |
|---|---|---|
| Ward -E Spill Page No.102 अ.क्र.3 | **पुतळे व देखभाल दुरुस्ती** वॉर्ड क्र.83 मधील विविध चौकांचे सुशोभिकरण करणे व इतर कामे करणे र.रु.15.00 लक्ष | वॉर्ड क्र.83 अंतर्गत गल्ली नं. 7 पुंडलिकनगर येथील उर्वरित रस्त्याचे कॉंक्रेटीकरण करणे र.रु. 7.00 लक्ष वळती करणे. |
| Ward -E Spill Page No. 95 अ.क्र.27 | **शहरी भागात रस्ते दुरुस्ती व पॅचवर्क** वॉर्ड क्र.83 येथील अस्तित्वात असलेल्या खडी रस्त्याची दुरुस्ती करणे र.रु. 3.00 लक्ष | वॉर्ड क्र.83 अंतर्गत गल्ली नं. 7 पुंडलिकनगर येथील उर्वरित रस्त्याचे कॉंक्रेटीकरण करणे र.रु. 3.00 लक्ष वळती करणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११३:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वोखार्ड कंपनी ते नारेगांव प्रभागातील रेडीयंट ॲग्रो केमीकल प्रा.ली. कंपनीच्या जवळील चौकास जय तुळजाभवानी चौक असे नांव देण्यांबाबत या भागातील नागरीकांनी सतत मागणी केलेली आहे. नागरीकांची मागणी विचारात घेता या चौकास जय तुळजाभवानी चौक असे नांव देण्यात यावे व सदरील चौकांचे सौदर्यीकरण तथा सुशोभिकरण करण्यात यावे जेनेकरुन या रस्त्यावरील वाहतुक सुरळीत होईल तसेच अपघात टळतील प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक: श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत,

अनुमोदक : श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव, श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वोखार्ड कंपनी ते नारेगांव प्रभागातील रेडीयंट ॲग्रो केमीकल प्रा.ली. कंपनीच्या जवळील चौकास जय तुळजाभवानी चौक असे नांव देण्यास व सदरील चौकांचे सौदर्यीकरण तथा सुशोभिकरण करण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११४:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.२६ गणेश नगर येथील विकास कामासाठी सन २०१२-२०१३ या अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यांत आलेली असुन खालील प्रस्तावित कामाऐवजी सुधारीत कामासाठी तरतुद ठेवण्यात येवुन काम हाती घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|
| अर्थसंकल्प पान क्र.४६ स्पील ओव्हर - वार्ड - ब नविन काम अ.क्र.६ वर वार्ड क्र.२६ सिडको एन-८ येथील सावरकर रुग्णालयाची संरक्षण भिंत दुरुस्ती करणे - रु. ५.०० लक्ष | वार्ड क्र.२६ विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे रु.५.०० लक्ष. |

सुचक : श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश, अनुमोदक : श्री.नागरे किशोर बाबुराव

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२६ गणेश नगर येथील विकास कामासाठी सन २०१२-२०१३ अर्थसंकल्पात ठेवण्यात आलेली तरतुद सुधारित विकास कामासाठी लेखाशिर्ष बदलण्यास मंजूरी देण्यात येते.

| प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|
| अर्थसंकल्प पान क्र.४६ स्पील ओव्हर - वार्ड - ब नविन काम अ.क्र.६ वर वार्ड क्र.२६ सिडको एन-८ येथील सावरकर रुग्णालयाची संरक्षण भिंत दुरुस्ती करणे - रु. ५.०० लक्ष | वार्ड क्र.२६ विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे रु.५.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११५:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेच्या निधीतून टि.व्ही.सेंटर चौक सुशोभिकरणाचे काम पुर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे त्या परीसराची शोभा निश्चित वाढली आहे. तेव्हा या पुढे टि.व्ही.सेंटर चौकात कोणत्याही प्रकारची जाहीरात, वॉल पेंन्टीग करणे, डिजीटल बॅनर लावणे, वा कोणत्याही प्रकारचे जाहीरातीचे व कार्यक्रमाचे बोर्ड लावण्यास प्रतिबंध करण्यात यावा की ज्यामुळे महानगरपालिकेने जे सुशोभिकरणाचे काम केले आहे ते टिकून राहील.

करीता वरील ठरावास मान्यता देवून त्याबाबतची योग्य ती कार्यवाही करण्यास प्रशासनास निर्देशित करावे व ही कारवाई कायमस्वरुपी राहवी अशी मागणी या ठरावाद्वारे केली जात आहे.

सुचक: श्री.माळवतकर महेश शिवाजीराव अनुमोदक : श्री.नागरे किशोर बाबुराव

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टि.व्ही.सेंटर चौक सुशोभिकरणाचे काम पुर्ण करण्यात आलेले असुने. त्यामुळे त्या परीसराची शोभा निश्चित वाढली आहे. तेव्हा या पुढे टि.व्ही.सेंटर चौकात कोणत्याही प्रकारची जाहीरात, वॉल पेंन्टीग करणे, डिजीटल बॅनर लावणे, वा कोणत्याही प्रकारचे जाहीरातीचे व कार्यक्रमाचे बोर्ड लावण्यास कायमस्वरूपी प्रतिबंध करण्यास मंजूरी देण्यात येवुन सदरील ठरावाची अंमलबजावणी प्रशासनाने कायमस्वरूपी करण्यास मंजूरी देण्यात येते..

वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>ऐनवेळीचे विषय</u>

**<u>विषय क्र ११६</u>**:

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहराच्या समांतर जलवाहिनी योजने करीता नक्षत्रवाडी येथे डोंगरावर अस्तित्वात असलेल्या संतुलन टाकीच्या बाजुला नविन योजने अंतर्गत संतुलित जलकुंभ बांधणे प्रस्तावित आहे. तसेच औरंगाबाद-जालना राज्य महामार्गालगत मौजे चिकलठाणा गावात महानगरपालिका हद्दीत गट नं.७३७ ही सरकारी मालकीची जमीन आहे. औरंगाबाद शहराच्या पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी चिकलठाणा गावालगत पाण्याची साठवण टाकी व जलकुंभ बांधण्याचे नियोजन आहे व या कामी सदर गट नं.७३७ मधील एक एकर (४००० चौ.मी.) जागेची औरंगाबाद महानगरपालिकेस आवश्यकता आहे.

उक्त नमुद जमीनी या शासकीय जमिनी असल्यामुळे या कार्यालयाचे पत्र जा.क्र.मनपा/काअ/पापु/वार्ड ब-क/२०१२/६५६ दिनांक ०३.०३.२०१२ अन्वये मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे गट क्र.९ नक्षत्रवाडी या गटातील एक हेक्टर (१०००० चौ.मी.) व गट नं. ७३७ चिकलठाणा या गटातील चाळीस आर (४००० चौ.मी.) क्षेत्र औरंगाबाद महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यासाठीची कार्यवाही करुन, सदर जागा उपलब्ध करुन देणे करीता विनंती करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाचे पत्र दिनांक ०३.१२.२०१२ नुसार महाराष्ट्र शासन महसुल व वन विभागाचे परिपत्रक क्र.जमीन ०८/२००८/प्र.क्र.११३/ज-१ दिनांक २८.०५.२०१२ नुसार औरंगाबाद महानगरपालिकेचा संमतीदर्शक ठराव सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

त्यानुषंगाने गट क्र.९ नक्षत्रवाडी या गटातील एक हेक्टर (१०००० चौ.मी.) व गट नं. ७३७ चिकलठाणा या गटातील चाळीस आर (४००० चौ.मी.) क्षेत्र औरंगाबाद महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याची मागणी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे करण्यासाठीचा प्रस्ताव तसेच मागणी केलेल्या जमिनीचे हिशोबीत होणाऱ्या मुल्यांकनानुसारची किंमत भरण्यास औरंगाबाद महानगरपालिका तयार असल्याबाबत मा.जिल्हाधिकारी यांना कळविणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहराच्या समांतर जलवाहिनी योजने करीता नक्षत्रवाडी येथे डोंगरावर अस्तित्वात असलेल्या संतुलन टाकीच्या बाजुला नविन योजने अंतर्गत संतुलित जलकुंभ बांधणे व शहराच्या पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी चिकलठाणा गावालगत पाण्याची साठवण टाकी व जलकुंभ बांधण्याचे नियोजन असल्याने गट क्र.९ नक्षत्रवाडी या गटातील एक हेक्टर (१०००० चौ.मी.) व गट नं. ७३७ चिकलठाणा या गटातील चाळीस आर (४००० चौ.मी.) क्षेत्र औरंगाबाद महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याची मागणी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे करण्यास व मागणी केलेल्या जमिनीचे हिशोबीत होणाऱ्या मुल्यांकनानुसारची किंमत भरण्यास औरंगाबाद महानगरपालिका तयार असल्याबाबत मा.जिल्हाधिकारी यांना कळविण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११७ :**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या कर्ज मागणी प्रस्तावानुसार आय.डी.बी.आय. बॅकेने खालील नमूद बाबीं करीता १. एम.एस.ई.डी. सी. एल. चे थकीत विद्युत देयकाची अदाई करणे. २. समांतर पाणी पुरवठा योजनेसाठी Water Payment Reserve Account मध्ये रक्कम जमा करणेसाठी रु. २०० कोटीचे कर्ज देणेसाठी डिसेंबर २०११ मध्ये मान्यता दिलेली आहे. औरंगाबाद महानगरपालिकेने सदर कर्जा संबंधाने आय.डी.बी.आय. बॅकेसोबत दि. २५.०४.२०१२ ला करार केला आहे. सदरील कर्ज मिळणेकरीता केलेल्या कराराच्या अटी / शर्तीनुसार आय.डी.बी.आय. बॅकेकडून कर्ज उभारणीच्या कार्यवाही अंतर्गत महानगरपालिकेच्या मिळकती बॅकेकडे तारण ठेवण्याच्या व त्या संबंधीची वैधानिक कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर करण्यात येत आहे. बॅकेच्या गरजेनुसार बॅकेने दिलेल्या इंग्रजी भाषेतील प्रस्तावाचा नमूना खालीलप्रमाणे मंजूरीस्तव सादर करण्यात येत आहे.

## Resolutions passed by the General Body of Aurangabad Municipal Corporation in its meeting for creation of Mortgage

The Mayor informed the General Body of Aurangabad Municipal Corporation (hereinafter referred to as "the Corporation or AMC") that the Corporation has been sanctioned Rupee Term Loan of Rs. 200 crore [Rupees Two Hundred crore only] by IDBI Bank Ltd. [IDBI Bank] in the month of December 2011 for the following purpose:

- To make payment of overdue electricity charges to Maharashtra State Electricity Distribution Company Ltd. and
- To utilize for land acquisition and creating Water Payment Reserve Account in order to facilitate starting project of Parallel Water Supply Line in the city of Aurangabad.

The Mayor further informed the General Body that on April 25, 2012, the Corporation entered into Loan Agreement with IDBI Bank in connection with the aforesaid financial assistance. The aforesaid financial assistance, as per the terms and conditions, agreed for, would have to be secured also by mortgage of 25 immovable properties of the Corporation as mentioned herein below.

The Mayor accordingly requested the General Body to pass the following Resolutions to enable the Corporation to execute Legal Mortgage Deed [in English Mortgage Form] in favour of IDBI Bank creating charge there under, on the 25 immovable properties of the Corporation as mentioned herein under.

## RESOLVED THAT

1. The Corporation do assign transfer and assure unto and create charge in favour of IDBI Bank [IDBI Bank] on the Corporation's immoveable properties Viz.,

**1] Property – I**

All that piece and parcel of property i.e. portion of land out of CTS No. 3167, admeasuring in all 4835.6 sq. meters, situated at Town Hall, Aurangabad [Aurangabad Municipal Corporation Main Building], Taluka and Registration Sub - District and District and Registration District - Aurangabad, Maharashtra,

**2] Property – II**

All that piece and parcel of property i.e. land of Weekly Vegetable Market bearing CTS No. 10272, admeasuring in all 1373.7 sq. meters, situated at Shahaganj, Aurangabad, Taluka and Registration Sub - District and District and Registration District - Aurangabad, Maharashtra,

**3] Property – III**

All that piece and parcel of property i.e. portion of land out of CTS No. 10242, admeasuring in all 47.18 sq. meters, situated at Shahaganj [Library], Aurangabad, Taluka and Registration Sub - District and District and Registration District - Aurangabad, Maharashtra,

**4] Property – IV**

All that piece and parcel of property i.e. portion of land out of CTS No. 2935, admeasuring in all 798.4 sq. meters, situated at Khadkeshwar, near Anjali Talkies [Library], Aurangabad, Taluka and Registration Sub - District and District and Registration District - Aurangabad, Maharashtra,

**5] Property – V**

All that piece and parcel of property i.e. portion of land out of CTS No. 14474, admeasuring in all 424.1 sq. meters, situated at Krantichowk [Hospital & Shopping Complex], Aurangabad, Taluka and Registration Sub-District and District and Registration District-Aurangabad, Maharashtra,

**6] Property – VI**

All that piece and parcel of property i.e. land bearing CTS No. 2383, admeasuring in all 7282.7 sq. meters, situated at Town Hall [AMC Premises], near Aurangabad Municipal Corporation office, Aurangabad, Taluka and Registration Sub - District and District and Registration District - Aurangabad, Maharashtra,

**7] Property – VII**

All that piece and parcel of property i.e. land of Nehru Bhavan Building, the said land admeasuring 5599.30 sq. meters, bearing corresponding CTS No. 3208, situated at Budhi lane,

Aurangabad, Taluka and Registration Sub - District and District and Registration District-Aurangabad, Maharashtra,

**8] Property – VIII**

All that piece and parcel of property i.e. portion of land out of CTS No. 10241 admeasuring in all 253.8 sq. meters, situated at Shanganj [Municipal Hospital], Aurangabad, Taluka and Registration Sub - District and District and Registration District - Aurangabad, Maharashtra,

**9] Property – IX**

All that piece and parcel of property i.e. portion of land out of CTS No. 2564, admeasuring in all 1923 sq. meters, situated at Jubilee Park [AMC Uddyan], Aurangabad, Taluka and Registration Sub - District and District and Registration District - Aurangabad, Maharashtra,

**10] Property – X**

All that piece and parcel of property i.e. portion of land out of CTS No. 10243, admeasuring in all 727.6 sq. meters, situated at Shahganj [Municipal Hospital & Library], Aurangabad, Taluka and Registration Sub - District and District and Registration District - Aurangabad, Maharashtra,

**11] Property – XI**

All that piece and parcel of property i.e. portion of land out of CTS No. 2568, admeasuring in all 3701 sq. meters, situated at Jubilee Park [AMC Uddyan], Aurangabad, Taluka and Registration Sub - District and District and Registration District - Aurangabad, Maharashtra,

**12] Property – XII**

All that piece and parcel of property i.e. portion of land out of CTS No. 7452, admeasuring in all 10202.2 sq. meters, situated on VIP Road [Nehru Bal Uddyan], Labour Colony, Aurangabad Municipal Corporation Aurangabad, Taluka and Registration Sub - District and District and Registration District - Aurangabad, Maharashtra,

**13] Property – XIII**

All that piece and parcel of property i.e. land Gut No. 66, Village Kanchanwadi, Tq. & Dist. Aurangabad, admeasuring to the extent of 5 acre 16 gunthe, situated at Village Kanchanwadi, Aurangabad Taluka and Registration Sub - District and District and Registration District - Aurangabad, Maharashtra,

**14] Property – XIV**

All that piece and parcel of property i.e. land Gut No. 5, Village Kanchanwadi Tq. & Dist Aurangabad, admeasuring to the extent of 2 Acre 12 Gunthe, situated at Village Kanchanwadi, Aurangabad Taluka and Registration Sub - District and District and Registration District - Aurangabad, Maharashtra,

**15] Property – XV**

All that piece and parcel of property i.e. land Gut No. 7/1, Village Kanchanwadi, Tq. & Dist Aurangabad, admeasuring to the extent of 10 Acre, situated at Village Kanchanwadi, Aurangabad, Taluka and Registration Sub - District and District and Registration District - Aurangabad, Maharashtra,

**16] Property – XVI**

All that piece and parcel of property i.e. land Gut No. 4, Village Kanchanwadi, Tq. & Dist Aurangabad, admeasuring to the extent of 2 Acre 38 Gunthe, situated at Village Kanchanwadi, Aurangabad, Taluka and Registration Sub - District and District and Registration District - Aurangabad, Maharashtra,

**17] Property – XVII**

All that piece and parcel of property i.e. land Gut No. 6, Village Kanchanwadi, Tq. & Dist Aurangabad, admeasuring to the extent of 4 Acre 27 Gunthe, situated at Village Kanchanwadi, Aurangabad Taluka and Registration Sub - District and District and Registration District - Aurangabad, Maharashtra,

**18] Property – XVIII**

All that piece and parcel of property i.e. land Gut No. 410, Village Chikalthana, admeasuring to the extent of 1 Hectare 21 R, situated at Village Chikalthana, Aurangabad Taluka and Registration Sub - District and District and Registration District - Aurangabad, Maharashtra,

**19] Property – XIX**

All that piece and parcel of property i.e. portion of land out of CTS No. 12041, admeasuring in all 25615 sq. meters, situated at Central Naka, Mechanical Work Shop, Aurangabad Municipal Corporation Aurangabad, Taluka and Registration Sub - District and District and Registration District - Aurangabad, Maharashtra,

**20] Property – XX**

All that piece and parcel of property i.e. CTS No. 19646, admeasuring in all 3667 sq. meters, situated at Bansilal Nagar, Station Road, Aurangabad Municipal Corporation, Aurangabad Taluka and Registration Sub - District and District and Registration District - Aurangabad, Maharashtra

**21] Property – XXI**

All that piece and parcel of property i.e. portion of building on land CTS No. 19381/18/1-A and 19381/8, the said portion admeasuring in all 838.50 sq. meters, situated at Railway Station Road, near Bansilal Nagar, Aurangabad, Taluka and Registration Sub - District and District and Registration District - Aurangabad, Maharashtra,

**22] Property – XXII**

All that piece and parcel of property admeasuring 2447 sq. meters, of constructed portion of building commonly known as Reliance Mall Building on CTS No. 15306/1, situated at Garkheda Road, Aurangabad, Taluka and Registration Sub - District and District and Registration District - Aurangabad, Maharashtra,

**23] Property – XXIII**

All that piece and parcel of property admeasuring 286.46 sq. meters, of constructed portion of building commonly known as City Marvel Complex on CTS No. 17804, situated at Aurangpura to Nirala Bazar Road, Aurangabad, Taluka and Registration Sub - District and District and Registration District - Aurangabad, Maharashtra,.

**24] Property – XXIV**

All that piece and parcel of property admeasuring 375 sq. meters, of constructed portion of building commonly known as City Pride Building, on CTS No. 12877/A/1, situated at Jalna Road, Aurangabad, Taluka and Registration Sub - District and District and Registration District - Aurangabad, Maharashtra,

**25] Property – XXV**

All that piece and parcel of property i.e. portion of land out of CTS No. 4588, admeasuring in all 846.3 sq. meters, situated at Aurangpura [Priya Market], Aurangabad, Taluka and Registration Sub - District and District and Registration District - Aurangabad, Maharashtra,

Together with all the building and structures constructed / erected thereon or to be constructed / erected thereon and all the fixed Plant, machinery and fixtures and fittings permanently attached to the earth or permanently fastened to anything attached to the earth or kept or lying thereon, both present and future [Immovable properties and moveable assets are hereinafter collectively referred to as 'Properties'] as security also for the due repayment, discharge and redemption by the Corporation to IDBI Bank of its Rupee Term Loan of Rs. 200 crore [Rupees Two Hundred crore only] together with interest, additional interest, liquidated damages, compound interest, premia on prepayment or on redemption, costs, charges and expenses payable under the loan agreement / documents as amended from time to time.

2. The draft of the Legal Mortgage Deed [in English Form] received from IDBI Bank [copy where of duly initiated by the Mayor for identification purposes, has been placed before the meeting] be and is hereby approved and Municipal Commissioner of the Corporation be and is hereby singly authorised to accept on behalf of the Corporation such modifications therein as may be suggested by IDBI Bank and to execute the Legal Mortgage Deed.

3. The common seal of the Municipal Corporation be affixed to the Legal Mortgage Deed [in English Form] in duplicate, in the presence of any two officials of the Municipal Corporation who shall sign the same in token thereof and authorised person who shall also sign the same in token thereof.

4. The Municipal Commissioner of the Corporation be and is hereby authorised singly to approve and finalise such other deeds and documents and to do all such other acts incidental thereto as may be required by IDBI Bank in connection with the said financial assistance and the Common Seal of the Corporation be affixed thereto in the presence of any two officials of the Municipal Corporation who shall sign the same in token thereof and any authorised person, who shall also sign the same in token thereof and in the event of the affixation of the Common Seal not being required, the same be executed singly by the officials aforementioned.

5. The Municipal Corporation do file the requisite particulars relating to Charge with appropriate authority / inform the State / Central Government as the case may within the time prescribed by law therefore.

सदर प्रस्ताव मान्यतेनंतर महानगरपालिकेच्या उपरोक्त नमूद मिळकती तारण ठेवण्यासंदर्भाने पुढील वैधानिक कार्यवाही करण्यात येईल. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

__ठराव__:

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या कर्ज मागणी प्रस्तावानुसार आय डी बी आय बँकेने प्रस्तावात नमुद बाबीकरीता १. एम एस ई डी सी एल चे थकीत विद्युत देयकाची अदाई करणे २. समांतर पाणी पुरवठा योजनेसाठी Water payment Reserve Account मध्ये रक्कम जमा करणेसाठी रू. २०० कोटीचे कर्ज देणेसाठी डिसेंबर २०११ मध्ये दिलेल्या मान्यतेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेने सदर कर्जा संबधाने आय.डी.बी.आय. बँकेसोबत दिनांक २५-४-२०१२ रोजीच्या करारनुसार सदरील कर्ज मिळणेकरीता केलेल्या कराराच्या अटी / शर्तीनुसार आय.डी.बी.आय बँकेकडून कर्ज उभारणीच्या कार्यवाही अंतर्गत प्रस्तावात नमुद केलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या मिळकती आय.डी.बी.आय.बँकेकडे तारण ठेवण्यास व त्या संबंधीची कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११८:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक इ एनयुआर -२००८/ प्र.क्र. २०३/नवि -३३ दिनांक २० फेब्रुवारी २०१० अंतर्गत महानगरपालिकेने विविध विकास कामांचे प्रकल्प प्रस्ताव शासनास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक १००७ दिनांक २०.०२.२०१० अन्वये शासन मंजुरीस्तव सादर करण्यात आलेले होते. सदरील महाअभियान अंतर्गत महानगरपालिकेने शहरातील मलनिःसारण व्यवस्था सुधारणे व मलप्रक्रिया केंद्र बांधणे बाबतचा/महाराष्ट्र जीवन प्राधीकरण पुणे विभाग यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केलेला रक्कम रुपये ३७६.१६ कोटीचा विस्तृत प्रकल्प अहवाल(DPR) महाअभियानाच्या प्रकल्प मान्यता व संनियंत्रण समितीच्या दिनाक १३.१२.२०१२ रोजी नागपुर येथे आयोजीत बैठकीत सादर करण्यात आलेला होता.सदरील बैठकीत उक्त प्रकल्प प्रस्तावास शासनाने तत्वतः मंजुरी प्रदान केलेली होती.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत महानगरपालिकेस एकुण प्रकल्प किंमती पैकी ७० टक्के रक्कम शासन अनुदान स्वरुपात प्राप्त होणार होती तसेच उर्वरीत ७० टक्के रक्कम कर्ज स्वरुपात महानगरपालिकेस उभारावयाची होती.

प्रकरणात मा.प्रधान सचिव (२) नगरविकास विभाग मंत्रालय,मुंबई यांनी उक्त रक्कम रुपये ३७६.१६ कोटींचा मलनिःसारण बाबतचा प्रकल्प प्रस्ताव हा **महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान ऐवजी लहान व मध्यम शहरांकरीता पायाभुत सोयी सुविधांचा विकास कार्यक्रम राबविणे** (URBAN INFRASTRUCTURE DEVELOPMENT SCHEME FOR SMALL AND MEDIUM TOWNS) **या योजने अंतर्गत सादर करणे बाबत औरंगाबाद महानगरपालिकेस सुचविले आहे. त्यामुळे आता महानगरपालिकेतर्फे रक्कम रु.३९४.७० कोटी एवढया रक्कमेचा सविस्तर सुधारीत प्रकल्प अहवाल दरसुची वर्ष २०१२-२०१३ नुसार तयार करण्यात आला. सदर प्रस्तावास मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे (महाराष्ट्र शासन नियुक्त तांत्रिक मान्यता प्रदान करणारी संस्था ) यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.**

केंद्र शासनाने देशातील लहान व मध्यम शहरांमध्ये पायाभुत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाचे उपअभियान **(UIDSSMT)** सुरु केलेले आहे.

**लहान व मध्यम शहरांकरीता पायाभुत सोयी सुविधा विकास कार्यक्रम** (URBAN INFRASTRUCTURE DEVELOPMENT SCHEME FOR SMALL AND MEDIUM TOWNS) **या योजने अंतर्गत एकुण प्रकल्प किंमती पैकी केंद्र शासनाचे ८०% अनुदान ,राज्य शासनाचे १० % अनुदान आणि महानगरपालिकेचा (ULB) १०% हिस्सा असणार आहे.**

**उक्त दोन्ही योजनेतील शासन अनुदानाचा विचार करता महानगरपालिकेस** शहरातील मलनिःसारण व्यवस्था सुधारणे व मलप्रक्रिया केंद्र बांधणे बाबतचा **प्रकल्प प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान ऐवजी लहान व मध्यम शहरांकरीता पायाभुत सोयी सुविधांचा विकास कार्यक्रम** (URBAN INFRASTRUCTURE DEVELOPMENT SCHEME FOR SMALL AND MEDIUM TOWNS) **या योजने अंतर्गत राबविणे आर्थिक दृष्टया फायदयाचे आहे.**

करीता उक्त रक्कम रु. ३९४.७० कोटी किंमतीचा मलनिःसारण योजना राबविणेचा प्रकल्प प्रस्ताव , **महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान ऐवजी लहान व मध्यम शहरांकरीता पायाभुत सोयी सुविधांचा विकास कार्यक्रम** (URBAN INFRASTRUCTURE DEVELOPMENT SCHEME FOR SMALL AND MEDIUM TOWNS) अंतर्गत राबविणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी एकुण प्रकल्प किंमती पैकी केंद्र शासनाकडून ८०% हिस्सा,राज्य शासनाकडून १० % हिस्सा अनुदान स्वरुपात मिळणेस्तव शासनास प्रस्ताव सादर करणे,एकुण प्रकल्प किंमती पैकी महानगरपालिकेच्या १०% हिश्याची रक्कम बँक /हुडको किंवा इतर संस्थांमार्फत उभारणे,केंद्र आणि राज्य शासनाने निर्देशित केलेल्या अनिवार्य सुधारणा व ऐच्छिक सुधारणा(Mandatory Reforms & Optional Reforms) कार्यक्रम राबविणे व त्या अनुशंगाने कार्यवाही करणे, UIDSSMT अंतर्गत नमुद अटी व शर्तीनुसार केंद्र/राज्य शासन स्तरावरील कार्यालयीन कार्यवाही /पत्रव्यवहार करणे,शासन अनुदान मिळणे करीता आवश्यक असलेले करारनामे (MoA)करणे, महानगरपालिकेचे या प्रकल्प खर्चासाठी राष्ट्रीयकृत बँकेत स्वतंत्र खाते उघडणे शहरातील ज्या गुंठेवारी वसाहतींमध्ये नागरीकांनी प्रशमन व इतर शुल्क

महानगरपालिकेस अदा केलेले आहे, अशा नियमित झालेल्या वसाहतींमध्ये देखील या प्रकल्पाअंतर्गत मलनिःसारण वाहीन्या टाकणेची कामे करणे, तसेच उक्त योजनेच्या संदर्भाने वेळोवेळी करावी लागणारी कार्यालयीन औपचारिकता पूर्ण करणेसाठी आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांना प्राधिकृत करणे. तसेच औरंगाबाद शहरासाठी रु. ३९४.७० कोटी एवढया किंमतीचा मलनिःसारण प्रकल्प UIDSSMT योजनेअंतर्गत राबविणेस प्रशासकीय मान्यता प्रदान करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरात भुमिगत मलनिःसारण आणि मलजल प्रक्रीया केंद्राची स्थापना करणे या बाबतचा रक्कम रु.३९४.७० कोटी किंमतीचा प्रकल्प महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान ऐवजी लहान व मध्यम शहरांकरीता पायाभुत सोयी सुविधा विकास कार्यक्रम (URBAN INFRASTRUCTURE DEVELOPMENT SCHEME FOR SMALL AND MEDIUM TOWNS) अंतर्गत राबविणेसाठी एकुण प्रकल्प किंमती पैकी केंद्र शासनाचा ८०% हिस्सा, राज्य शासनाचा १०% हिस्सा अनुदान स्वरुपात मिळणेस्तव शासनास प्रस्ताव सादर करणे, एकुण प्रकल्प किंमती पैकी महानगरपालिकेचा १०% आर्थिक सहभाग प्रकल्प खर्चात नोंदविण्यासाठी बँकेमार्फत/ हुडको किंवा इतर संस्थांमार्फत कर्ज अथवा महानगरपालिकेच्या निधीतून रक्कमेची उभारणी करणे, केंद्र आणि राज्य शासनाने निर्देशित केलेल्या अनिवार्य सुधारणा व ऐच्छिक सुधारणा (Mandatory Reforms & Optional Reforms) कार्यक्रम राबविणे व त्या अनुशंगाने आवश्यक कार्यवाही करणे, UIDSSMT अंतर्गत नमुद अटी व शर्तीनुसार केंद्र / राज्य शासन स्तरावरील आवश्यक कार्यालयीन कार्यवाही करणे, शासन अनुदान मिळणे करीता आवश्यक असलेले करारनामे (MoA) करणे, सदर प्रकल्पांकरीता महानगरपालिकेचे स्वतंत्र बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत उघडणे, शासन स्तरावरील पत्रव्यवहार / कार्यवाही करणे, शहरातील ज्या गुंठेवारी वसाहतींमध्ये नागरीकांनी प्रशमन व इतर शुल्क महानगरपालिकेस अदा केलेले आहे अशा नियमित झालेल्या वसाहतींमध्ये देखील या प्रकल्पातून मलनिःसारण वाहीन्या टाकणेची कामे करणे, तसेच उक्त योजनेच्या संदर्भाने वेळोवेळी करावी लागणारी आवश्यक कार्यालयीन कार्यवाही करणे करीता आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना महानगरपालिकेच्या वतीने प्राधिकृत करणे बाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. तसेच औरंगाबाद शहरासाठी रु. ३९४.७० कोटी एवढया किंमतीचा मलनिःसारण प्रकल्प UIDSSMT योजने अंतर्गत राबविणेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रश्न क्र.०१:**

श्री.संजय केनेकर :प्रश्न विचारले होते आस्थापना विभागाने सविस्तर माहिती दिली नाही

मा.महापौर :आताच या प्रश्नाचे खुलासा आलेला आहे उशीर का झाला खुलासा करावा.

अस्थापना अधिकारी-१ :यात एकच प्रश्न या विभागाशी संबधीत आहे स.सदस्य यांचे आजच पत्र माझेकडे आले श्रीमती सिधु सुरडकर व श्रीमती आर एस गायकवाड यांचे बाबतीत आजच माहिती दिली या दोन्ही कर्मचा-याची १९९२ ला महापालिकेत नियुक्ती झाली.

श्री.संजय केनेकर :दैनिक वेतनावर की प्रकल्प विभागा अंतर्गत नियुक्ती केले.

अस्थापना अधि.-१ :त्याची मनपा अंतर्गत नियुक्ती अशी की या योजने अंतर्गत विविध कार्यक्रम आयोजित करणेत येतात झोपडपट्टीतील जनतेच्या कार्यक्रमात सहभागी करण्यासाठी या कर्मचा-याची नियुक्ती समुह संघटक म्हणून करण्यात आली १२०० प्रतिमहा वेतन देणे संदर्भात आदेश आहे

श्री.संजय केनेकर :यांना मनपाच्या आस्थापनेवर की योजने अंतर्गत घेतले होते.

अस्थापना अधि-१ :तसे आदेशात नमुद नाही समुह संघटक म्हणून आवश्यकता आहे म्हणून त्यांना नियुक्त केले होते.

श्री.संजय केनेकर :एकीकडे दै.वेतन कर्मचारी आहे व दुसरीकडे योजने अंतर्गत काम करून घेतले जाते असे दाखवले जाते. योजनेतील कर्मचारी दै.वेतनावर घेता येत नाही.

अस्थापना अधि-१ :१९९२ ला आस्थापनेवर यांची नियुक्ती केली योंजना ही २००५ मध्ये आली.

श्री.संजय केनेकर :याचा पगार कोण अदा करते.

आस्थापना अधि-१ :महापालिका फंडातून

श्री.संजय केनेकर :योजनेसाठी नियुक्त केले असेल तर दै.वेतनावर कसे घेतले.

श्री.कृष्णा बनकर :दैनिक वेतनावर अस्थापनेवर अनेक दिवसापासून कर्मचारी काम करतात त्यांना कायम का केले नाही.सुवर्ण जयंती योजना ही शासनाची असते या योजने अंतर्गत तेथे असलेल्या कामगारांचा पगार ही शासनच करते

आस्थापना अधि-१ :या कर्मचा-यांना १९९२ मधे् १२००रू पगारावर घेतले सुवर्ण जयंती योजना नंतर आली जेंव्हा झोपडपट्टीचा सर्वे करायचा होता त्यावेळी हे कर्मचारी घेतले नंतर त्यांना दै.वेतनावर केले.

श्री.संजय कनेकर :१९९२ ला हे कर्मचारी घेतले तेंव्हा महापालिकेत समुह संघटक नव्हते का सुवर्ण जयंती योजनेतील काही कर्मचारी दै.वेतनावर केले चौकशी करावी.

श्री.कृष्णा बनकर :समुह संघटक हा त्याच विभागासाठी असतो दै.वेतनावर का केले.

श्री.संजय कनेकर :समुह संघटक हे महापालिकेचे कर्मचारी असेल तर योजनेचे काम कसे देवू शकता.

मा.महापौर :या संदर्भात प्रशासनाने चौकशी करून स.सदस्य यांना लेखी उत्तर द्यावे.

**<u>प्रश्न क्र.०५</u>:**

श्री.कृष्णा बनकर :या प्रश्नाचे उत्तर मला मिळाले नाही.नियमानुसार किती दिवसात उत्तर द्यायला पाहिजे.

कार्य.अभियंता(श्री.कोल्हे):सभा संपल्यानंतर लगेच उत्तर दिले जाईल.

श्री.्राजू शिंदे :डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळयाचे सुशोभिकरण करण्यासाठी १०-११मध्ये बजेटमध्ये तरतूद असतांना अदयाप काम का झाले नाही.

शहर अभियंता :यासाठी २० लक्षची तरतूद आहे.ते काम मंजूर झाले अग्रीमेंन्ट झाले वर्क ऑर्डर दिल्यानंतर लगेच काम सुरू होईल.

श्री.मिलींद दाभाडे :३ वर्ष का लागले. कोणामुळे उशीर झाला खुलासा घ्यावा

या वेळी अनेक स.सदस्य एकाच एवेळी बोलत असतात.

मा.महापौर :ताबडतोब काम सुरू करावे.

श्री.गिरजाराम हाळनोर :शांततेच चर्चा होवून माहिती घेण्याची तयारी नसेल तर सभा संपवावी.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

शहर अभियंता :भडकल गेट येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा व बाजूचा परीसर सुशोभिकरण करण्याकरीता सन २०११-१२ मध्ये २५ लक्षची तरतूद होती ती सन १२-१३ च्या बजेटमध्ये स्पील ओव्हर म्हणून आली या कामाची निविदा काढली त्यानंतर जे सुशोभिकरणा बाबतचे डिझाईन होते ते शासकीय अभियांत्रिकी कॉलेज कडून ते मंजूर करून घ्यायचे होते यास ३ महिण्याचा कालावधी लागला उशीर होण्यास वार्ड अ चे अभियंता व शाखा अभियंता हे जबाबदार आहे संबधीतास नोटीस दिली कार्यवाही चालू आहे.

श्री.कृष्णा बनकर :अशा प्रकारच्या सर्वच संचिका शासकीय अभियांत्रिकी कडे मान्यतेसाठी गेल्या होत्या का ?

शहर अभियंता :१४ एप्रिल पर्यत काम करण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.राजू शिंदे :रिवाईज बजेट मध्ये तरतूद वाढवावी २० लक्ष मध्ये काम होणार नाही ५० लक्ष करावे.१४ एप्रिल २०१३ पर्यत काम करावे.

मा.महापौर :भडकल गेट येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळा परिसरातील चौकाचे सुशोभिकरण १४ एप्रिल पर्यत करण्यात यावे.

श्री.विरभद्र गादगे :महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा बसविण्या बाबत मंजूरी दिलेली आहे कार्यवाही होत नाही. आता त्यांची जयंती आहे तोपर्यत पुतळा बसविण्याचे काम करावे.

मा.महापौर :महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा बसविण्या बाबत ताबडतोब कार्यवाही करावी.

**<u>प्रश्न क्र.९</u>:**

श्री.अफसर खॉन :चिकलठाणा गट न. ४०८ येथील बांधकाम प्रकरणात ८-१० कर्मचारी दोषी त्या सर्वावर गुन्हा दाखल होईल असे म्हटले होते. परंतु उपआयुक्त श्री.निकम व एक कर्मचारी यांचेवर गुन्हा दाखल झाला त्या पदाचा अनेकांकडे पदभार होता. स.सदस्य श्री.चौधरी उपोषणास बसणार म्हणून उपआयुक्त श्री.निकम यांनी संचिका मागवून घेतली व स.सदस्य उपोषणास बसणार आहे ताबडतोब कार्यवाही करावी असे आदेशीत केले परंतु कार्यवाही झाली नाही ज्यांची चुक नाही त्यांचेवर गुन्हा दाखल जे दोषी त्यांचेवर गुन्हा दाखल व्हावा जे दोषी नाही त्यांचेवर गुन्हा दाखल केला तो मागे घ्यावा.

मा.महापौर :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

प्र.उपआयुक्त (म) :स.सदस्य श्री. बेहडे अशोक यांनी जो प्रश्न विचारला तो प्रशासकीय विभागाशी संबधीत आहे त्यांचे उत्तर देण्यात आले आहे.प्रश्न ९ चे उत्तर असे की मा.आयुक्तानी जे आदेश दिले होते त्यात त्यांनी म्हटले होते की बांधकाम परवानगी कशासाठी दिली अतिरिक्त वगैरे हा मुद्या नसावा सदरील बांधकाम परवाना हा अनधिकृत असल्यास बांधकाम निष्काशित करावे असे आदेश २८-०३-२०१२ रोजी संचिकेमध्ये दिले त्या तारखेस उपआयुक्त सिडको पदभार श्री.अजय चारठाणकर यांचेकडे होता आदेशाचे पालन केले आहे असे उत्तर दिले .

श्री.अफसर खान :संबधीत अधिकारी यांनी आदेशाचे पालन केले नाही त्यांचेवर गुन्हा का दाखल केला नाही.

श्री.प्रशांत देसरडा : मा.आयुक्त यांनी ते बांधकाम निष्काशीत करावे असे आदेश दिले होते उत्तर देतांना सांगतात मा.आयुक्ताच्या आदेशाचे पालन केले हे मा.न्यायालयासमोर सादर करणार आहे कार्यवाही केली नाही सभेत या विषयी चर्चा झाली आदेशाचे पालन केले सांगितले चुकीची माहिती दिली त्या अधिका-यावर काय कार्यवाही करणार आहे.

श्री.अफसर खॉन :८-१० अधिकारी कर्मचारी यात दोषी आहे जाणूनबूजून ज्यांनी परवानगी दिली काम करायला लावले त्यांचेवर काय कार्यवाही झाली.

डॉ.जफर खान :ज्यांचेवर कार्यवाही झाली ती चुकीची वाटते.

श्री.राजू शिंदे : उपआयुक्त प्र. यांनी संचिका मागीतली कार्यवाहीचे आदेश दिले कार्यवाही झाली का , मा.आयुक्तांनी आदेश दिल्यानंतर सदर संचिका ३ ते साडेतीन महिणे नगररचना विभागात होती. कार्यवाही होत नाही म्हणून स.सदस्य श्री. चौधरी यांनी उपोषणास बसणार पत्र दिले त्यामुळे उपआयुक्त सिडको यांनी ती संचिका त्यांचेकडे २-३ चार्ज असतांना सुध्दा मागवून घेतली व

कार्यवाही करावी आदेशीत केले त्यानंतर थोडया फार प्रमाणात कार्यवाही केली ्उपआयुक्तांनीआदेश दिल्यानंतर खालचे कर्मचारी यांनी कार्यवाही करणे अपेक्षीत होते. कार्यवाही केली असे सांगितले. ज्या अधिका-यांनी दोन दिवसात संचिका मागवून घेतली कार्यवाहीचे आदेश दिले दोन दिवस त्यानंतर सुट्टी होती १७ तारीख आली व ज्यांनी निष्काळजी पणा केला त्यांचेवर कार्यवाही केली केली नाही जे अधिकारी चांगले काम करतात त्यांनी दोन दिवसात संचिका मागवून घेतली त्यांचेवरच गुन्हे दाखल होतात हे योग्य वाटत नाही. ज्या विभागात ३ महिणे संचिका होती त्या अधिका-यावर कार्यवाही झाली नाही. जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही व्हावी

जी कार्यवाही उपआयुक्त व एक कर्मचारी यांचेवर झाली ती मागे घ्यावी.

श्री.अफसर खान :जे या प्रकरणात दोषी आहे त्यांचेवरही गुन्हे दाखल करावे.

श्री.प्रशांत देसरडा :प्रश्न दिला होता मा.आयुक्ताचे आदेशाचे पालन केले असे उत्तरात दिले काय पालन केले माहिती दयावी

उपआयुक्त (म) :दिं.२७-३-२००१२ रोजी मा.आयुक्त यांनी बांधकाम परवानगी कशासाठी आहे अतिरिक्त व्यतिरिक्त मुद्या नसावा.बांधकाम अनधिकृत असेल तर तात्काळ निष्काशित करावे असे आदेश केले तत्कालिन उपआयुक्त श्री. चारठाणकर यांनी या आदेशाचे पालन केले.

श्री.प्रशांत देसरडा :आदेशाचे पालन केले होते तर मा.न्यायालयाचे स्टे कशासाठी दिला

प्र.उपआयुक्त (म) :मा.आयुक्तांनी आदेशीत केल्यानुसार तत्कालीन उपआयुक्त श्री. चारठाणकर यांनी दिं. २-४-२०१२ रोजी सदर संचिकेत बांधकाम कशासाठी आहे व व्यतिरीक्त बांधकाम झाले आहे जी परवानगी आहे त्या व्यतिरिक्त बांधकाम आहे या तपासणीसाठी संचिका नगररचना विभागाकडे पाठविली.

श्री.अशोक बेहडे :हे बांधकाम कशासाठी आहे मंजूरी कशासाठी मिळाली होती.

श्री.अफसर खान :संबधीतास स्टे मिळण्यासाठी वेळ का दिला गेला तातडीने कार्यवाही का झाली नाही.

मा.आयुक्त :मार्च २०१२ पासून हे काम सुरू होते त्या बातत तक्रारी आल्या आयुक्त म्हणून मी आदेशीत केले परंतु या ना त्या कारणाने कार्यवाही करण्यास फाटे फुटले शेवटीची जी टिप्पणी होती त्यात एक कमेटी स्थापन केली कमेटीचा अहवाल १६-११-२०१२ रोजी प्राप्त झाला अहवाल पाहिल्यानंतर २९-११-२०१२ रोजी असे आदेश केले की या गंभीर प्रकरणात निष्काळजी पणा झाला आहे हे स्पष्ट दिसून येते तथापि स.सदस्य श्री. संजय चौधरी यांनी दिनांक १६-७-१२ पासून उपोषणास बसल्याचे पत्र दिल्यानंतरची कार्यवाही १-२ दिवसातच पुर्ण होणे अपेक्षीत होते वर नमुद केल्याप्रमाणे दिनांक १३-७-१२ ते १७-७-१२ स्थगिती आदेश होईपर्यतची कार्यवाही संबधीतास मा.न्यायालयामध्ये जाण्यास वेळ मिळावा या उद्देशाने संथ गतीने केल्याचा समितीच्या निष्कर्षाशी सहमत आहे वास्तविक दिनांक १३-७-१२ रोजी संपूर्ण अनधिकृत बांधकाम तोडणे आवश्यक होते वरील रितसर नमुद केल्याप्रमाणे श्री.विधाते इ.निरीक्षक व तत्कालीन उपआयुक्त श्री. रविंद्र निकम हे जबाबदार दिसतात याचे विरूध्द तात्काळ गुन्हे नोंदवा व वरील टिप्पणीत जे मुद्ये नमुद केले त्या सर्व संबधीतांना जबाबदार धरण्यात आले व कार्यवाही बाबत नोटीसा दिल्या तत्कालीन प्रशासकीय

अधिकारी यांनी दिं. ९-९-११ ला चर्चा करा असा शेरा दिला आणि १-११-११ ला चर्चा केली सादर करा म्हणून नोंद केली व दिं.२-११-११ रोजी नोटीस दिली इ.निरीक्षक श्री. वीर व श्री.राठोड यांना दोघांनाही जबाबदार धरावे म्हणून लिहिले होते.परिच्छेद १० प्रमाणे तत्कालीन प्रशासकीय अधिकारी कु सपना वसावा यांनी भोगवटा प्रमाणपत्र दिले आहे काय याची विचारणा करण्यासाठी सहा.संचालक न. र यांचे कडे पाठविले त्यांनी प्रमाणपत्र दिले नाही म्हणून २०-३-२०१२ रोजी परत पाठविले या दरम्यानचा कालावधी २-११-११ ते २०-३-२०१२ पर्यत संचिका श्री. विधाते यांचेकडे होती असे दिसते. त्यांनी त्यांचे सादरीकरणामध्ये तारीख टाकलेली नाही.२१-३-१२ रोजी अनधिकृत बांधकाम पाडण्यासाठी तत्कालीन प्र.अधिकारी कु.सपना वसावा यांनी सादर केले त्यास २७-३-२०१२ रोजी आयुक्तानी मान्यता दिली वास्तविक तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक होते परंतु श्री. विधाते प्र. अधिकारी व उपआयुक्त सिडको परत संचिका नगररचना विभागाकडे अभिप्रायासाठी पाठविली.२-४-१२ ते ८-५-१२ पर्यंत क.अभियंता श्री. सिद्यीकी व उपअभियंता यांनी सहा.संचालक नगररचना यांचेकडे सादर केली आणि एक्ट्रा काम दाखवावे असा शेरा नोंदविला तपासणी अंती पुन्हा संचिका १३-७-१२ रोजी सहा.संचालक न.र यांनी ती संचिका उपआयुक्त सिडको यांचेकडे पाठविली २-४-१२ ते १३-७-१२ पर्यंत संचिका नगर रचना विभागामध्ये होती.दिं. ११-७-१२ रोजी स.सदस्य चौधरी यांनी १३-७-१२ पासून उपोषणास बसणार म्हणून पत्र दिले संचिका नगर रचना विभागात होती दिं.१३-७-१२ रोजी उपआयुक्त सिडको व इतरांनी कार्यवाही केली भिंत पाडली यात प्रथम दर्शनी श्री.विधाते व श्री. रविंद्र निकम जबाबदार आहे १३-७-१२ ते १७-७-१२ हा जो कालावधी गेला याच कालावधीत स.श्री. चौधरी हे उपोषणास बसले होते त्यांचे उपोषण मागे घेण्या बाबत स.पदाधिकारी यांनी विनंती केली होती पथक कार्यवाही साठी पाठविण्यात आले होते.१३ तारखेला काम केले नाही १४ सुट्टी होती काम करावे सुचना दिल्या काम केले नाही १५ सुट्टी होती १६ तारखेला काम केले नाही १७ तारखेला त्यावर स्थगिती आली ज्यांनी ज्यांनी संचिका हाताळाली त्या सर्वांना यात जबाबदार धरण्यात आले सर्वांना नोटीसा काढण्यात आल्या दिल्या त्यांचे म्हणणे सादर केले आहे.९ जानेवारीला संचिका माझ्याकडे आली कोण जबाबदार आहे ते स्पष्ट दयावे असे म्हटले संचिका परत केली जे जे यात जबाबदार आहे ज्यांची चुक आहे ते दर्शविले पाहिजे त्यांचे वर जाबबदारी फिक्स केली पाहिजे असे प्रशासनाचे मत आहे.

श्री.राजू शिंदे :नगररचना विभागात ३ महिणे संचिका होती त्यांचेवर कार्यवाही केली नाही ज्यांनी दोन दिवसात संचिका मागवून घेतली त्यांचेवर कार्यवाही केली हे योग्य नाही.

श्री. अशोक बेहडे :बांधकाम परवानगी रद्य केल्यानंतर बाधकांम निष्कशित करू शकतो की अगोदर,बांधकाम परवानगी रद्य करण्याचा अधिकार नगररचना अधिकारी यांना आहे लाईट बील आल्यानंतर सुध्दा परवानगी रद्य का केली नाही.

मा.आयुक्त :एखादे बांधकाम परवानगी व्यतिरिक्त अतिरिक्त बांधकाम केले त्यांची पाहणी उपआयुक्त सिडको प्रशासकीय अधिकारी यांनी केल्यानंतर निदर्शनास आले जास्तीचे आहे ते पाडावे रद्य करण्याची गरज नाही.

श्री.राजू शिंदे :उपआयुक्त सिडको यांचेवर गुन्हा दाखल झाला मागे घ्यावा अशा पदावरील अधिकारी यांचे गुन्हा दाखल करतांना सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी लागते ती घेतली नाही स.सदस्य उपोषणास बसणार होते म्हणून त्यांनी संचिका मागवून घेतली तसा त्यांचा काही संबध येत नव्हता व त्यांचे कडे प्र.चार्ज होता.ज्यांचेकडे ३ महिण्यापासून संचिका होती त्यांचेवर कार्यवाही होत नाही जो गुन्हा दाखल केला तो मागे घ्यावा जे दोषी आहे त्यांचेवरही कार्यवाही व्हावी.

श्री.गिरजाराम हळनोर :जो गुन्हा दाखल केला तो मागे घ्यावा जे जे दोषी आहे त्यांचेवर कार्यवाही करावी.

डॉ.जफर खान :जे या प्रकरणात दोषी आहे त्या सर्वांवर कार्यवाही व्हावी.

मा.महापौर : जे यात दोषी त्या सर्वांवर कार्यवाही करण्यात येईल.

श्री.प्रशांत देसरडा :प्रश्न देवून माहिती विचारली होती की शासनाने ४ मे २००६ रोजी ही महापालिका ड वर्गात समावेश केले त्यानुसार जास्तीचे पदोन्नतीने पदे भरणा केली का माहिती विचारली असता उत्तर दिले सोबत यादी त्यानुसार उपअभियंता पदे २७ आहे क वर्ग महापालिकेसाठी ७ उपअभियंता असावे असे असतांना ड वर्गात असलेल्या या महापालिकेत २७ उपअभियंता पदे जास्तीची पदे भरली खर्च वाढला विकास कामे होत नाही त्या बाबत प्रशासन काय कार्यवाही करणार आहे माहिती दयावी.

मा.आयुक्त :जो खुलासा दिला तो प्रशासनाच्या माध्यमातूनच दिलेला आहे.

श्री.प्रशांत देसरडा :क वर्ग महानगरपालिके करीता ७ उपअभियंता असावे परंतु २७ उपअभियंता आहे यास प्रशासनाची मान्यता आहे.सदरील पदे रद्य करावी अशी मागणी करतो यास माझा विरोध आहे.

श्री.नासेर खान :सिल्लेखाना ते सावरकर चौक रस्त्याच्या कडेला आयलँड च्या अंतर्गत महापालिकेच्या जागेवर बांधकाम चालू आहे या बाबत कार्यवाही करण्याची मागणी करतो कुणाच्या दबावाखाली काम होत आहे कार्यवाही का होत नाही.

प्रशासकीय अधि. :मागच्या वेळी प्रश्न उपस्थित केला तेंव्हा जे शेड होते त्या बाबतीत कार्यवाही केली. आयलँडच्या अंतर्गत असलेले अतिक्रमण कार्यवाही अंतर्गत आहे इ.निरीक्षक यांना निर्देश दिले आहे.

मा.महापौर : या संदर्भात एक आडठयात प्रशासनाने अतिक्रमण काढण्यात यावे.

श्री.मीर हिदायत अली :दिल्लीगेटच्या पुढे सलीम अली सरोवर च्या जागेवर एक शाळा आहे या शाळेने ७०X५० इतक्या जागेवर अतिक्रमण केले. २ कोटीची जागा असून मनपाचे अधिकारी कार्यवाही करण्यास गेले असतात त्यांचेवर संबधीत मालकाने कुत्रे सोडले सर्व लोक हा प्रकार पाहत होते. संबधीत शाळेचे मालक यांचेवर कार्यवाही व्हावी.पैशाची मागणी केली असे संबधीताचे म्हणणे आहे याची चौकशी होवून कार्यवाही व्हावी.

श्री.जुबेर गाझी :सलीम अली सरोवर परीसर जागेत एका व्यक्तीने माती मुरूम टाकून जागा बळकावण्याचा प्रयत्न करीत आहे ते अतिक्रमण काढावे.संबधीतावर कार्यवाही व्हावी.

श्री.गिरजाराम हाळनोर :महापालिकेचे अधिकारी कार्यवाही साठी गेले असतां त्यांचेवर कुत्रे सोडले अधिकारी यांना परत यावे लागले चांगले काम करणारे अधिकारी कर्मचारी यांना समर्थन केले पाहिजे कर्मचारी अधिकारी यांचेवर जी कार्यवाही झाली ती मागे घ्यावी व सदरील अतिक्रमण तातडीने काढावे.

| | |
|---|---|
| श्री.अमीत भुईगळ | :सदर जागा महापालिकेच्या ताब्यात घेवून तेथे महापालिकेचे बोर्ड लावावे संबधीतावर कार्यवाही करावी. |
| मा.महापौर | :सलीम अली सरोवरातील जागेवर झालेले अतिक्रमण ताबडतोब काढावे त्या जागेवर महापालिकेच्या नावाचा बोर्ड लावण्यात यावा तसेच अतिक्रमण काढतांना संबधीत वार्डाचे स.सदस्य यांना विश्वासात घेवून कार्यवाही करावी जे की कार्यवाही करतांना अडचणी निर्माण होणार नाही. |
| श्री.अफसर खॉन | :टाऊन सेन्टर सिडको भागात एका व्यक्तीला २००० एक्स्ट्रा एफएसआय दिला कसा दिला भोगवटा प्रमाणपत्र कसे दिले गेले माहिती दयावी. |
| सहा.संचालक(न.र) | :सिडको टाऊन हॉल भागात खलील नावाने व्यक्ती यांनी बांधकाम केले त्यांना सिडकोने परवानगी दिली होती त्यानंतर कोर्ट प्रकरण झाले त्याशी संबधीत कोर्टाने सिडकोला आदेश दिले की यांना बांधकाम परवानगी दयावी बांधकाम परवानगी झाल्यानंतर त्यांनी मनपाकडे पुन्हा सुधारीत बांधकाम परवानगी सिडकोच्या एनओसीप्रमाणे मागीतली सिडकोने दिलेल्या एनओसीच्या अधारे त्यांना मनपाने शासनाच्या धोरणानुसार स्टेअरकेस वापरुन एफएसआय व त्यांचा प्रिमीयम भरून बांधकाम परवानगी देण्यात आली.सबधीतांनी भोगवटा प्रमाणपत्र सादर केले.त्यांनी एकच हॉल ठेवला काही चेजेंस केले त्यास पुर्ववत ठेवून त्यांनी एफएसआय ठेवलला होता म्हणून त्यास भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे. |
| श्री.अफसर खान | :एक्स्ट्रा एफएसआय मनपाला देण्याचा अधिकार आहे का ? |
| सहा.संचालक(न.र) | :बांधकाम परवानगी प्रस्ताव मंजूर करतांना पार्टीस व स्टेअरकेस व एफएसआयची कार्यवाही करतांना तें मिळून त्यांना बांधकाम परवानगी दिली आहे. |
| श्री.अफसर खान | :भोगवटा प्रमाणपत्र देता येते का? |
| डॉ.जफर खान | : एक्स्ट्रा एफएसआय देता येत नाही चुकीची माहिती मिळते आहे. |
| श्री.खाजा शरफोद्यीन | :संबधीतानी पार्कींग रस्त्यावर आहे. जास्तीच्या जागेवर परवानगी देतो हे योग्य नाही. |
| श्री.अफसर खान | :या संदर्भात चौकशी करावी. |
| मा.महापौर | :संबधीत प्रकरणा संबधी चौकशी करून नियमानुसार कार्यवाही करावी. |
| श्रीमती छाया वेताळ | :माझ्या वार्डात ५ महिण्यापासून अतिक्रमण झाले रस्त्यावर हातगाडया लावल्या जातात. लहान मुले शाळेत जातांना अपघात झाले अतिक्रमण काढण्याची मागणी केली कार्यवाही होत नाही. |
| प्रशासकीय अधिकरी | :स.सदस्या यांचे वार्डात टप-या व हातगाडयाचा प्रश्न आहे.अतिक्रमण विभागाकडे दोन वाहने कर्मचारी आहे. जेथे अनधिकृत रित्या हातगाडया उभ्या असतात त्यांचे मागे हे पथक कार्यवाही करते गेल्या शुक्रवारी हातगाडया हटविल्या पुन्हा असतील तर कार्यवाही केली जाईल एका गाडीत ५-६ टप-या हातगाडया बसतात नवीन पध्दतीने आता टपरी हातगाडी काढल्यानंतर संबधीताकडून बॉण्डपेपर लिहून घेत आहोत की यापूढे या ठिकाणी अतिक्रमण करून गाडी व टपरी लावणार नाही. |
| मा.महापौर | :या संदर्भात संबधीतांना दंड लावून कार्यवाही करावी रस्ता मोकळा करावा भाजी मंडई साठी शिवाजी नगर पाण्याच्या टाकीच्या बाजूला असलेल्या जागेवर देण्यास हरकत नाही |

| | |
|---|---|
| श्रीमती सविता सुरे | :माझ्या वार्डात पाण्याची टंचाई निर्माण झाली पाण्याचे टँकर उपलब्ध करून दयावे नसता मी वार्डातील नागरीका सोबत उपोषणास बसणार आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणाराची बीले दिली जात नाही त्यामूळे काही ठिकाणी पाणी मिळत नाही पाणी हा जिव्हाळयाचा प्रश्न असून टँकर मालक यांना बीले देण्यात यावी पाणीपुरवठा सुरळीत करावा. |
| मा.महापौर | :ताबडतोब या भागात टँकरद्वारे पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| श्री.राजू शिंदे | :नगररचना विभागाचे कामकाज कसे चालते २००९ पासून किती परवानगी दिली उत्पन्न किती येते या विभागाची चौकशी करावी ठराव मंजूर केला तसेच मालमत्ताचे खाजगीकरण करणार असे पेपरला वाचतो. हे सत्य आहे का ? |
| श्री.सुर्यकांत जायभाये | :पाणीपुरवठा विभागाकडून टँकर उपलब्ध नाही असे उत्तर येते यांत्रिकी विभागाने आवश्यक ते टँकर पाणीपुरवठयासाठी उपलब्ध करून देण्याचे आदेशीत करावे. |
| श्री.बाळासाहेब मुंडे | :माझ्या वार्डात व गुंठेवारी भागात पाण्याची टंचाई निर्माण झाली टँकर वाढवून दयावे. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | :महापालिकेत प्रशासक की जनरल बॉडी आहे हेच कळत नाही. जानेवारी २०१३ पासून सीटी वॉटर युटीलिटी काम दिले आता पुन्हा कोण पाणी देणार प्रश्न उपस्थित होतो. |
| कार्य.अभियंता-पापू | :वार्ड अ ड मध्ये पहिल्या दिवशी ६० व दुस-या दिवशी ६५ ट्रिपा वार्ड ब व क मध्ये पहिल्या दिवशी ६४ व दुस-या दिवशी सुध्दा ६४ ट्रिपा वार्ड ई व फ मध्ये पहिल्या दिवशी १५४ ट्रिपा व दुस-या दिवशी १४७ अशा प्रकारे पहिल्या दिवशी २७८ ट्रिपा व दुस-या दिवशी २७६ ट्रिपा होतात व यापोटी प्रत्येक नागरीकाकडून २०००रू भरणा करून घेतो पाणी दयावे म्हणून ३३६ अर्ज संध्या प्रलंबीत आहे या लोकांना पाणी दयायचे असेल तर २१ जास्तीचे टँकर लागतील. यासाठी वेगळी खर्चाची तरतूद केली पाहिजे.संबधीताचे पेमेंन्ट वेळेवर देता आले तर टँकर सुरू करता येईल.पाणी टंचाई निवारण करण्यासाठी शासनाची मदत मिळणार आहे आज मा.पालकमंत्री यांचे समवेत बैठक झाली मदत देणार असे आश्वासन दिले. |
| श्री.कृष्णा बनकर | :प्रत्येक वार्डात मागणीनुसार इंधन विहिरी कराव्यात. |
| श्री.अफसर खान | :वार्डात इंधन विहिरी कराव्यात ४ पत्र दिले कार्यवाही होत नाही.सध्या पाण्याची टंचाई मोठया प्रमाणात आहे. |
| श्री.बाळासाहेब मुंडे | :शासन मदत देईल न देईल परंतु सध्या पाण्याची टंचाई आहे पाणी देण्या बाबत कार्यवाही व्हावी टँकरची संख्या वाढवावी. |
| श्री.गिरजाराम हळनोर | :शहरात पाणी टंचाई निर्माण झाली ही जबाबदारी महापालिकेची आहे पाणीपुरवठा मुबलक कसा करायचा प्रशासनाने ठरवावे शहरातील संपुर्ण नागरीकांना पाणी कसे देता येईल या बाबत कार्यवाही करावी. |
| मा.महापौर | :शहरातील गुंठवारी व इतर भागात वेळेवर व मुबलक पाणी देणेसाठी प्रशासनाने टँकरची संख्या वाढवावी. |

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (०५)

## दिनांक १९.०१.२०१३ रोजी आयोजीत सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे.

**स.स श्री.केनेकर संजय किसनराव :**
**प्रश्न क्र. ०१ ते ०४:**
**उत्तर: (प्रकल्प संचालक (सुजयो))**

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| ०१. प्रकल्प विभागाअंतर्गत सुवर्ण जयंती योजनेतील कर्मचारी श्रीमती सिंधु सुरडकर व श्रीमती आर.एस.गायकवाड यांचे मुळ नियुक्ती आदेश काय आहेत? मुळ नियुक्ती संचिका अवलोकनार्थ देण्यात यावी. | प्रकल्प विभागातील कर्मचारी श्रीमती सिंधु सुरडकर व श्रीमती आर एल गायकवाड यांचे मुळ नियुक्तीचे आदेश सोबत जोडले आहेत. तसेच मळ नियुक्तीची संचिका झेरॉक्स अवलोकनार्थ देण्यात येत आहे. |
| ०२.प्रकल्प विभागातील श्रीमती.आर.एस.गायकवाड व श्रीमती सिंधु सुरडकर यांचे कामाचे मुल्यांकन (आजपर्यंतचे) रेकॉर्ड अवलोकनार्थ सभेपुर्वी देण्यात यावे. त्यांचेकडुन सद्यस्थितीत काय काम करुन घेण्यात येत आहे? | प्रकल्प विभागातील श्रीमती सुरडकर व श्रीमती आर.एल.गायकवाड यांचे कामाचे मुल्यांकनाची संचिक झेरॉक्स प्रत अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे. तसेच सद्यास्थितीत श्रीमती सुरडकर यांचेकडे वार्ड 'क' ची कामे सोपवली आहेत. तर श्रीमती आर.एल.गायकवाड यांचेकडे वार्ड 'अ' ची कामे व कार्यालयीन कामे कॅशबुक हाताळणे ई कामे सोपवली आहेत. |
| ०३. सुवर्ण जयंती योजनेतील समुह संघटकाचे मुदतवाढीचे आदेश कोणत्या विभागाकडुन प्रत्येक वेळी काढण्यात येतात? | सुजयोतील समुह संघटकांचे मुदतवाढीचे आदेश अस्थापना विभागातुन काढण्यात येतात. |
| ०४. सुवर्ण जयंती योजनातील समुह संघटकाचे मुदतवाढीचे आदेश वेळेवर का निघत नाहीत. विलंबाबाबत जबाबदारी कोणाची आहे? | सुजयोतील समुह संघटकांचे मुदतवाढीचे प्रस्ताव विहीत वेळेत मुल्यांकन करुन प्रकल्प विभागाकडुन शिफारस केले जाते. |

**स.स.श्री.बनकर कृष्णा सांडुजी::**
**प्रश्न क्र. ०५ ते ०८:**
**उत्तर: (वार्ड अभियंता वार्ड फ)**

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| ०५. तात्कालीन स्थायी समिती सभापती मा.श्री.राजु शिंदे यांनी सन-२०१०-२०१२ या कालावधीमध्ये शहरातील कोणकोणत्या पुतळयाचे सुशोभिकरण करणेसाठी अंदाजपत्रकीय पुस्तीकेत समावेश केलेला आहे. व या प्रत्येक चौकासाठी/पुतळयासाठी किती-किती रकमेची तरतुद ठेवण्यात आलेली आहे. | वार्ड क्र ६६ अंतर्गत तानाजी पुतळा येथे विद्युत व्यवस्था करणे व सुशोभिकरण करणे या कामासाठी सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पात शहर सौदर्यीकरण नविन कामे या लेखाशिर्षा अंतर्गत रु. ५.०० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली होती. |
| ०६. यापैकी आजपर्यंत कोणकोणत्या चौकाचे व पुतळयाचे सुशोभिकरण करण्यात आलेले आहे, त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. | आजपर्यंत वार्ड फ अंतर्गत वार्ड क्र ६६ अंतर्गत तानाजी पुतळयाचे सुशोभिकरण करण्यात आले. |
| ०७. तसेच ज्या चौकाचे/ पुतळा परिसराचे सुशोभिकरण करण्यात आले, त्यावर झालेला खर्च किती? कामे कोणत्या एजन्सीकडुन करुन घेण्यात आली? त्यांना देण्यात आलेले देयके किती? याबाबत एम.बी.सह माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी | आजपर्यंत वार्ड फ अंतर्गत वार्ड क्र ६६ अंतर्गत तानाजी पुतळयाचे सेशोभिकरण करणेचे काम मे.मॉडेल आर्ट या एजन्सी मार्फत झालेले असुन सदर कामासाठी मोजमाप पुस्तिका क्र २५९४ रक्कम रु ४७३०२४/- इतका खर्च झालेला आहे. |

| | |
|---|---|
| ०८. तसेच सद्यस्थितीत कोणत्या चौकाचे / पुतळ्याचे सुशोभिकरणाचे काम थांबलेले आहे, त्याची कारणे काय आहेत? सदरील कामे शासकीय अभियांत्रिकेच्या मार्गदर्शनाखाली चालु आहे का? ज्या चौकाचे /पुतळ्याचे कामाची संचिका शासकिय अभियांत्रिकेच्या मार्गदर्शनासाठी पाठविलेली असेल, त्या संचिकेची छायांकित प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी. | निरंक |

**स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव :**
**प्रश्न क्र. ०९ ते १३:**

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| **प्रश्न क्र.०९:** चिकलठाणा गट क्र.४०८ येथील बांधकाम संचीकेच्या १९ क्रमांकाच्या वर मा.आयुक्तांचे दिनांक २८/३/२०१२ रोजी काय आदेश दिले होते व त्या तारखेस प्रशासन उपायुक्त (सिडको) पदभार कोणाकडे होता व त्यांनी आदेशाचे पालन केले कींवा नाही. | अप्राप्त |
| **प्रश्न क्र.१०:** स.स.श्री.संजय चौधरी यांची दि. ९/०८/२०१२ च्या पत्रा मध्ये मुख्य मागणी काय होती व ती मान्य केली किंवा नाही व का? | |
| **प्रश्न क्र. ११:** दिनांक २/११/२०११ च्या जोड पत्र ६ मध्ये काय आढळले व नगर रचना विभागाने बांधकाम परवानगी रद्द का केली नाही | |
| **प्रश्न क्र.१२:** त्या बांधकामावर विज जोडनी पोल्ट्री फर्मच्या नांवे आहे काय व दुसऱ्या नावावर असल्यास त्वरीत बांधकाम परवानगी रद्द का करण्यांत आली नाही? | |
| **प्रश्न क्र.१३:** सदरील संचीका नगर रचना विभागात कीती दिवस होती व १२/११/२०१२ पर्यंत का होती? | |

**स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष,**
**प्रश्न क्र. १४ ते १६:**
**उत्तर: (अस्थापना अधिकारी-१ )**

| प्र.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १४ | महानगरपालिकेत आस्थापनेवर 'ड' वर्ग महानगरपालिकेनुसार कोणकोणती पदे (अधिकारी वर्गाची) उपलब्ध आहेत व त्या पदावर सध्या कोणकोणते अधिकारी कार्यरत आहेत ? त्यांचे पदनाम व कार्यरत अधिकारी याची नावासह यादी देण्यात यावी. | यासोबत यादी जोडण्यात आलेली आहे. |
| १५ | महाराष्ट्र शासन निर्णय क्र.संकीर्ण-१००५/ वर्गीकरण/प्र.क्र.३७९/०५/नवि-२४,मंत्रालय , मुंबई-४०००३२ दि.४/५/२००६ नुसार असलेल्या पदनामानुसार अधिकारी वर्गात जास्तीची अधिकारी संवर्गातील पदे भरण्यात आली आहे काय ? भरण्यात आली असल्यास कोणत्या नियमान्वये भरण्यात आली व कोणकोणती पदे भरण्यात आली ? त्यांची नावासह माहिति द्यावी. | याबाबत शासन निर्णय दि.४/५/२००६ च्या पान क्र.४ वरील मुद्दा क्र.६ मध्ये सविस्तर माहिती दर्शविण्यात आलेली आहे. (सुलभ संदर्भासाठी शासन निर्णयाची छायांकीत प्रत जोडण्यात येत आहे.) तसेच जास्तीची पदे भरण्यात आलेली आहे, त्यांची यादी यासोबत जोडण्यत आलेली आहे. |
| १६ | शासनाकडून महानगरपालिकेकडे प्रतिनियुक्तीवर कोणकोणते अधिकारी आले आहेत ? त्यांची नांवे व कार्यकाळ यांची माहिति देण्यात यावी. तसेच सदरील पदावर '३' वर्ग तालिकेनुसार अधिकारी पाठविण्यात आले आहेत काय ? | यासोबत यादी जोडण्यात आलेली आहे. |

**प्रश्न क्र.१४**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सध्या रिक्त | उपआयुक्त | उपआयुक्त (महसूल) |
| २. | श्री.रविंद्र निकम | उपआयुक्त | उपआयुक्त (प्रशासन) |
| ३. | सध्या रिक्त | उपआयुक्त | उपआयुक्त (सिडको) |
| ४. | सध्या रिक्त | मुल्य निर्धारक व संकलक अधिकारी | मुल्य निर्धारक व संकलक अधि. |
| ५. | श्री.मो.रा.थत्ते | मुख्य लेखा परीक्षक | मुख्य लेखा परीक्षक |
| ६. | श्री.अ.आ.थोरात | मुख्य लेखाधिकारी | मुख्य लेखाधिकारी |
| ७. | सध्या रिक्त | आरोग्य वैद्यकीय अधिकारी | आरोग्य वैद्यकीय अधिकारी |
| ८. | श्री.एम.डी.सोनवणे | शहर अभियंता/ जल अभियंता | शहर/अधिक्षक अभियंता |
| ९. | श्री.एस.डी.पानझडे | कार्यकारी अभियंता | कार्यकारी अभियंता |
| १०. | श्री.सय्यद सिकंदर अली | कार्यकारी अभियंता | कार्यकारी अभियंता |
| ११. | श्री.एच.ए.कोल्हे | कार्यकारी अभियंता | कार्यकारी अभियंता |
| १२. | श्री.डी.पी.कुलकर्णी | सहा.संचालक नगर रचना | सहा.संचालक नगर रचना |
| १३. | डॉ.बी.एस.नाईकवाडे | पशु शल्य चिकीत्सक/संबंधित अधिकारी | मुख्य पशुसंवर्धन अधिकारी |
| १४. | श्री.एम.ए.पठाण (हज कमेटी मुंबई येथे प्रतिनियुक्तीवर) | -- | नगर सचिव |
| १५. | श्री.एस.बी.झनझन | -- | मुख्य अग्निशमन अधिकारी |
| १६. | श्री.विजय पाटील | पर्यावरण संवर्धन अधिकारी | वृक्ष संवर्धन/ उद्यान अधिक्षक |
| १७. | श्री.शेख खमर | उपअभियंता | उपअभियंता |
| १८. | श्री.पी.आर.बनसोडे | उपअभियंता | उपअभियंता |
| १९. | श्री.सिद्यीकी एम.एच.अफसर | उपअभियंता | उपअभियंता |
| २०. | श्री.पी.जी.पवार | उपअभियंता | उपअभियंता |
| २१. | श्री.एस.डी.काकडे | उपअभियंता | उपअभियंता |
| २२. | श्री.व्ही.एम.निकम | उपअभियंता | उपअभियंता |
| २३. | श्री.एम.बी.काझी | उपअभियंता | उपअभियंता |
| २४. | श्री.आय.बी.खाजा | उपअभियंता | उपअभियंता |
| २५. | श्री.व्ही.जी.वझे | उपअभियंता | उपअभियंता |
| २६. | श्री.ए.बी.देशमुख | उपअभियंता | उपअभियंता |
| २७. | श्री.एस.पी.खन्ना | उपअभियंता | उपअभियंता |
| २८. | श्री.बी.जी.बोईनवाड | उपअभियंता | उपअभियंता |
| २९. | श्री.एस.एल.पवार | उपअभियंता | उपअभियंता |
| ३०. | श्री.स.फईमोद्यीन सिद्यीकी | उपअभियंता | उपअभियंता |
| ३१. | श्री.के.आर.कुलकर्णी | उपअभियंता | उपअभियंता |
| ३२. | श्री.यु.जी.शिरसाठ | उपअभियंता | उपअभियंता |
| ३३. | श्री.भागवत दिनकर फड | उपअभियंता | उपअभियंता |
| ३४. | श्री.आर.एन.संधा | उपअभियंता | उपअभियंता |
| ३५. | रिक्त | कायदा/विधी अधि. | विधी सल्लागार |
| ३६. | श्रीमती सपना वसावा | सहाय्यक आयुक्त | सहाय्यक आयुक्त |

| | | | |
|---|---|---|---|
| ३७. | श्रीमती शुभांगी आंधळे | सहाय्यक आयुक्त | सहाय्यक आयुक्त |
| ३८. | श्री.विठ्ठल डाके | सहाय्यक आयुक्त | सहाय्यक आयुक्त |
| ३९. | श्रीमती प्रियंका केसरकर | सहाय्यक आयुक्त | सहाय्यक आयुक्त |
| ४०. | श्री.अय्युब खान नूर खान | -- | आस्थापना अधि.१ |
| ४१. | श्री.सी.एम.अभंग | -- | आस्थापना अधि.२ |
| ४२. | श्री.ए.ई.लाड | -- | वॉर्ड अधिकारी |
| ४३. | श्री.व्ही.डी.राठोड | -- | वॉर्ड अधिकारी |
| ४४. | श्री.एस.आर.जरारे | -- | वॉर्ड अधिकारी |
| ४५. | श्री.दिलीप सुर्यवंशी | -- | वॉर्ड अधिकारी |
| ४६. | श्री.बी.डी.पैठणे | -- | वॉर्ड अधिकारी |
| ४७. | श्री.अजमत खान | -- | वॉर्ड अधिकारी |
| ४८. | रिक्त | लेखाधिकारी | लेखाधिकारी |
| ४९. | श्री.एन.जी.दुर्रानी | लेखाधिकारी | लेखाधिकारी |
| ५०. | श्री.महावीर पाटणी | उपमुख्य लेखा परिक्षक | उपमुख्य लेखा परिक्षक |
| ५१. | सध्या रिक्त | शिक्षणाधिकारी | शिक्षणाधिकारी |
| ५२. | श्री.पी.के.खोब्रागडे | -- | स्वीय सहाय्यक |
| ५३. | डॉ.जयश्री जगन्नाथ कुलकर्णी | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |
| ५४. | डॉ.संध्या जी.टाकळीकर | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |
| ५५. | डॉ.चंद्रकला गायकवाड | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |
| ५६. | डॉ.सविता दिलीप उबाळे | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |
| ५७. | डॉ.निता नामदेव बोंडेकर | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |
| ५८. | डॉ.मनिषा बलवंत भोंडवे | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |
| ५९. | डॉ.वंदना अंनत तिखे | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |
| ६०. | डॉ.अंजली शिंदे | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |
| ६१. | डॉ.बाबासाहेब उनवणे | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |
| ६२. | डॉ.अर्चना राणे | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |
| ६३. | डॉ.संगिता प्रशांत पाटील | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |
| ६४. | डॉ.ए.डी.देशमुख | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |
| ६५. | डॉ.सुरेश गोसावी | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |

| | | | |
|---|---|---|---|
| ६६. | डॉ.प्रेमलता कराड | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |
| ६७. | डॉ.शैलजा जाधव | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |
| ६८. | डॉ.संगिता परोपकारी | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |
| ६९. | डॉ.स्मिता एन.बोंडेकर | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |
| ७०. | डॉ.बाळकृष्ण डी.राठोडकर | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |
| ७१. | डॉ.प्रेरणा बडेरा | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |
| ७२. | डॉ.उज्वला रणजित भामरे | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |
| ७३. | डॉ.चंद्रशेखर जी. चव्हाण | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |
| ७४. | डॉ.डिंपल पी.परदेशी | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |
| ७५. | डॉ.मेघा मदनराव जोगदंड | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |
| ७६. | डॉ.तलत अतिख काझी | सहा.सार्वजनिक आरोग्य अधि. | वैद्यकीय अधिकारी |

**<u>प्रश्न क्र.१५</u>**

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री.स.फईमोद्यीन सिद्यीकी | उपअभियंता |
| २. | श्री.के.आर.कुलकर्णी | उपअभियंता |
| ३. | श्री.यु.जी.शिरसाठ | उपअभियंता |
| ४. | श्री.भागवत दिनकर फड | उपअभियंता |
| ५. | श्री.आर.एन.संधा | उपअभियंता |
| ६. | श्री.एच.ए.कोल्हे | कार्यकारी अभियंता |

**<u>प्रश्न क्र.१६</u>**

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नांव | पदनाम | कार्यकाळ |
|---|---|---|---|
| १. | श्री.मो.रा.थत्ते | मुख्य लेखा परीक्षक | दि.२/५/२०१२ पासून आजपावेतो |
| २. | श्री.अ.आ.थोरात | मुख्य लेखाधिकारी | दि.१४/६/२०१२ पासून आजपावेतो |
| ३. | डॉ.बी.एस.नाईकवाडे | मुख्य पशुसंवर्धन अधिकारी | दि.१०/६/२००८ पासून आजपावेतो |

| | | | |
|---|---|---|---|
| **४.** | **श्रीमती सपना वसावा** | **विशेष कक्ष प्रमुख, मालमत्ता कर आकारणी** | **दि.११/११/२०१० पासून आजपावेतो** |
| **५.** | **श्रीमती शुभांगी आंधळे** | **स्थानिक संस्था कर विभाग** | **दि.२७/८/२०१० पासून आजपावेतो** |
| **६.** | **श्री.विठ्ठल डाके** | **प्र.उप आयुक्त (सिडको)** | **दि.९/८/२०१२ पासून आजपावेतो** |
| **७.** | **श्रीमती प्रियंका केसरकर** | **प्रशासकीय अधिकारी** | **दि.२४/१२/२०१२ पासून आजपावेतो** |

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद